cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६९ | शुक्रवार, दि.०४ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## संपादकीय

### रोजगार : कळीचा मुद्दा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेषतः उत्पादन क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यासाठी 'एम्प्लॉयमेंट लिंक्ड इन्सेंटिव्ह' योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणारे उद्योजक किंवा उत्पादक यांना आर्थिक स्वरूपात मदत देतानाच रोजगार स्वीकारणार्या युवकांनासुद्धा आर्थिक मदत देण्याची ही योजना देशातील बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी करेल, अशी आशा करायला हरकत नाही.

### शुभमन गिलनं इंग्लंडमध्ये इतिहास रचला, ९३ वर्षात दुसऱ्यांदाच अशी कामगिरी

मुंबई : भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवसाचं पहिलं सत्र भारतानं गाजवलं. पहिल्या दिवशी भारतानं २११ धावांवर ५ विकेट गमावल्या होत्या. यानंतर शुभमन गिल आणि रवींद्र जडेजा या दोघांनी २०३ धावांची भागीदारी केली. शुभमन गिल सध्या १६८ धावांवर नाबाद आहे. तर, रवींद्र जडेजा ८९ धावा करुन बाद झाला आहे. शुभमन गिलनं १५० धावा करत एक इतिहास रचला आहे. इंग्लंडमध्ये त्यांच्या विरुद्ध १५० धावा करणारा गिल दुसरा कर्णधार ठरला आहे. या शानदार कामगिरीच्या जोरावर शुभमन गिलनं जेम्स अँडरसन– सचिन तेंडुलकर ट्रॉफीत ३०० धावा करणारा पहिला खेळाडू ठरला आहे. भारत इंग्लंड कसोटी मालिकेचं नाव पटौदी ट्रॉफी ऐवजी अँडरसन–तेंडुलकर ट्रॉफी करण्यात आलं होतं.

# मराठवाडा कोरडा; राज्यातील धरणांत आवक वाढली

## शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत; सोयाबीन पेरणीला विलंब

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**राज्यभरात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे गोदावरी नदीच्या पूर परिस्थितीत वाढ झाली आहे. मराठवाडा वगळता राज्यातील धरणामधील पाण्याची आवक वाढली आहे. दमदार पावसाच्या शेतकरी प्रतिक्षेत असून सोयाबीनच्या पेरणीसाठी आता विलंब झाल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.**



गंगापूर धरणातून दुपारी बारा वाजता ३७१६ वेगाने पाण्याचा विसर्ग गोदावरीत सुरू झाला. नाशिकमध्ये रामकुंड परिसरातील छोटे मोठे मंदिर पुन्हा पाण्याखाली गेले आहेत. दुतोंड्या मारुतीच्या गुडघ्यापर्यंत पुराचे पाणी लागले आहे. दुसरीकडे आषाढी एकादशीच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांमुळे उजनी धरणात होणारा पाण्याचा विसर्ग बंद करण्यात आला. राज्यात बहुतांश धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे. काही धरणांमधून विसर्ग सुरू झाला आहे. नदीच्या पाणीसाठ्यातही वाढ झाली आहे. तर दुसरीकडे मराडवाडा मात्र अजूनही कोरडा आहे. गेल्या महिनाभरापासून पाऊस नसल्याने अनेक भागात दुबार पेरणीचे संकट ओढावले असून शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

राज्यातील बहुतांश मोठ्या धरण प्रकल्पांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक जलसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली. पुण्यात गेल्या वर्षी १५ टक्क्यांवर असलेला उपयुक्त जलसाठा यंदा ५८.२१ टक्क्यांवर आहे. नाशिकच्या ही बहुतांश धरण क्षेत्रांमध्ये चांगला पाऊस झाल्याने गेल्यावर्षी १७ टक्क्यांवर असलेला पाणीसाठा यंदा ५२.५४ टक्क्यांवर आहे. मराठवाड्यातील ही बहुतांश धरणांमध्ये पाण्याची आवक वाढत आहे.

### उजनीतून पाण्याचा विसर्ग बंद

आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना चंद्रभागेच्या पाण्यात सुरक्षित पवित्र स्नान करता यावे यासाठी उजनी धरणातून गेल्या काही दिवसांपासून भीमा नदीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग आज पूर्णपणे थांबविण्यात आला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत होता. त्यामुळे चंद्रभागेची पाणी पातळी सातत्याने कमी अधिक होत होती. आता आषाढी सोहळ्याला केवळ तीन दिवस उरल्याने आजपासून उजनी धरणातला विसर्ग पूर्णपणे थांबवलाय. त्यामुळे सध्या पात्राच्या बाहेर आलेली चंद्रभागा उद्या पुन्हा पात्रात जाणार आहे. सध्या उजनी धरणात १०२ टीएमसी एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. धरणात जवळपास १२,००० क्युसेक विसर्गने पाणी जमा होत आहे.

# पालकमंत्री अजित पवारांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीमुळे बीड येथे 'सीट्रिपलआयटी' उभारणीच्या कामाला गती

## बीडमधील 'सीट्रिपलआयटी'साठी एमआयडीसीकडून चार हजार चौरस मीटर जागा व निधी देण्याचा निर्णय



मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने बीड येथे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' अर्थात 'सीट्रिपलआयटी'साठी बीड एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राच्या सुविधा क्रमांक तीन मधील चार हजार चौरस मीटर जागा तसेच केंद्र उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध

### पालकमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारामुळे 'सीट्रिपलआयटी'चा मार्ग खुला

करुन देण्याचा निर्णय 'एमआयडीसी'च्या संचालक मंडळाने घेतला आहे. या निर्णयामुळे बीड जिह्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन होण्याचा मार्ग खुला झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण बैठका घेऊन 'सीट्रिपलआयटी'च्या उभारणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली आहे. 'एमआयडीसी'च्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे केंद्रासंदर्भातील त्रिपक्षीय करार आणि प्रकल्पाचे भूमीपूजन लवकरच होईल अशी अपेक्षा आहे. गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठात नगरपरिषदेतर्फे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून 'सीट्रिपलआयटी' यापूर्वीच सुरु करण्यात आली आहे. रत्नागिरी ◀◀ पान २ वर

### अजितदादांमुळे बीड जिल्ह्यात औद्योगिक वातावरण विकसित होईल–डॉ.योगेश क्षीरसागर



बीड : उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या पुढाकारामुळे या महत्वाकांक्षी 'सीट्रिपलआयटी' (सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲण्ड ट्रेनिंग) या प्रकल्पाच्या उभारणीस गती मिळाली आहे. प्रकल्पासाठी ४ हजार चौ.मी. जागा मंजूर केली असून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला आहे. अजितदादांमुळे जिल्ह्यात औद्योगिक वातावरण विकसित होईल, असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर ◀◀ पान २ वर

# अर्वाच्य भाषेत अधिकाऱ्याला धमकावले

## सादिक इनामदार विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

महिला अधिकाऱ्याच्या कक्षात जाऊन अर्वाच्य भाषेत धमकावले आणि लज्जास्पद वर्तन केल्याप्रकरणी तथाकथित समाजसेवक सादिक बाबामियां इनामदार याच्या विरुद्ध बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात काम करून घेण्यासाठी धमकावणे आणि विनयभंग प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, बीड जिल्हा परिषदेच्या एका महिला अधिकाऱ्याला दिनांक २ जुलै रोजी सादिक बाबामियां इनामदार यांनी दिनांक २३ जून ते २ जुलै २०२५ दरम्यान कार्यालयात वारंवार येऊन अपंग अनुकंपा प्रस्ताव मंजूर करा, म्हणून जोरजोरात ओरडून आरेरावी केली. दिनांक २३ रोजी औरंगाबाद येथे बैठक असलेल्या ठिकाणी येऊन सकाळी ११ ते पाच वाजेपर्यंत थांबून दिवसभर मागे फिरला. दि. २५ रोजी कार्यालयात येऊन अपंग प्रस्ताव मंजूर करा,असे म्हणून अरेरावी केली. तर आपण यापूर्वीच्या अधिकाऱ्यांचे व्हिडिओ तयार केलेले असून त्यांचे घोटाळे उघडकीस आणले आहेत. माझ्याकडे पिस्टल परवाना आहे, असे म्हणून एकटक बघून अर्वाच्य भाषा वापरली. दिनांक २ जून रोजी कार्यालयात येऊन, मोठ्याने ओरडून, लज्जास्पद वर्तन केले. कार्यालयाच्या दालनात अर्वाच्य अरेरावी केल्यानंतर बाहेर कक्षात असलेल्या कनिष्ठ अधिकाऱ्याला ही उलट सुलट बोलून अर्वाच्य भाषेत हातवारे करून लज्जास्पद भाषा वापरून धमकावले. ◀◀ पान २ वर

# आषाढी एकादशीला भाविकांची कसलीही गैरसोय होऊ नये –आ.संदीप क्षीरसागर

## पोलीस, आरोग्य, एस.टी., महावितरण विभागाला दिल्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

**आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.**

रविवारी (दि.६ जुलै २०२५) रोजी आषाढी एकादशी आहे. एकादशीच्या निमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे संपूर्ण बीड जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच बीड जिल्ह्यातून अनेक भाविक पंढरपुरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्याच्या प्रत्येक भागातून भाविक येतात. त्यांच्यासाठी सर्व आगारांतून श्री क्षेत्र नारायणगडावर जाणे–येणेसाठी दिवसभर विशेष बसेसची व्यवस्था



करावी आणि श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी एस.टी. विभागाचे विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शन रांग याबाबतचे नियोजन करण्याच्या पोलीस विभागाला सूचना दिल्या आहेत. तसेच श्री क्षेत्र ◀◀ पान २ वर

# लक्ष्मण हाकेंची हालत भटक्या कुत्र्यासारखी करु

## राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरज चव्हाण यांचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

दोन समाजात तेढ निर्माण व्हावी, म्हणून जाणीवपूर्वक लक्ष्मण हाके स्टंटबाजी करत आहेत. लक्ष्मण हाकेंची हालत भटक्या कुत्र्यासारखी करु असा इशारा राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी दिला. सुरज चव्हाण म्हणाले, दोन समाजात तेढ निर्माण व्हावी, म्हणून ◀◀ पान २ वर

# आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा



**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय एड्स प्रतिबंध व नियंत्रण, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण, पीसीपीएनडीटी, फ्लोरेसीस, मौखिक आरोग्य या आरोग्य विभागांच्या कार्यक्रमांसह, रुग्ण कल्याण समिती, १०८ रुग्णवाहिका, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य, आयुष्यमान भारत आदी योजना, आरोग्य विभागाकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज घेतला.**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात हा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी आरोग्य सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास ◀◀ पान २ वर

# तुळजाभवानी मंदिर परिसरात आठ पुजाऱ्यांना प्रवेश बंदी

## एका पुजाऱ्याची चुक इतरांना भोवली

**तुळजापुर । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मंदिरात आठ पुजाऱ्यांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. तुळजाभवानी मंदिर संस्थांनाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. एका पुजाऱ्याच्या चुकीमुळे हे पाऊल उचलण्यात आले आहे.**

तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखू खाऊन थुंकल्याप्रकरणी मंदिर संस्थानाकडून या पुजाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मंदिराची पवित्रता आणि शिस्त जपण्यासाठी मंदिर प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात आली. या निर्णयानंतर मंदिरातील पुजाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, भक्तांकडून स्वागत करण्यात आले आहे.

मंदिरातील काही पुजारी मंदिर परिसरात तंबाखू खाऊन थुकत अस्वच्छता करत होते. याप्रकरणी पुजाऱ्यांना नोटीस पाठवून ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### १.०५ लाख कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदीला मंजुरी

नवी दिल्ली–संरक्षणमंत्र्यांनी १.०५ लाख कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदीला मंजुरी दिली आहे. ही खरेदी पूर्णपणे देशात केली जाईल. आर्मर्ड रिकव्हरी व्हेईकल्स खरेदी केली जातील. इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली खरेदी केल्या जातील. जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे खरेदी केली जाणार आहेत.

### एकनाथ शिंदेंकडून विठ्ठल–रुक्मिणीचे मुखदर्शन

पंढरपूर–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पाटबंधारे मंत्री गिरीश महाजन, आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर यांनी पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणीचे मुखदर्शन घेतले आहे. व्हीआयपी दर्शन बंद केले असल्याने तीनही मंत्र्यांनी श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचे मुखदर्शन आहे.

### राष्ट्रवादीचे आ. अनिल पाटील मंत्रीपदासाठी इच्छुक

जळगाव–पक्षाच्या आढावा बैठकीत राष्ट्रवादीचे आमदार अनिल पाटील यानी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासमोर मंत्रीपदाबाबतची जाहिरपणे इच्छा बोलून दाखविली आहे. त्यामुळे पक्ष नेमकी काय भुमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### दगडूशेठ हलवाई गणपतीची प्रति मूर्ती सिंगापूरला निघाली

पुणे– येथील दगडूशेठ हलवाई गणपतीची प्रति मूर्ती सिंगापूरला निघाली आहे, महाराष्ट्रात मंडळाकडे मूर्ती पाठवली जाणार आहे. सिंगापूरात पाच दिवसाचा गणपती साजरा होणार आहे. दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात आरती करून मूर्ती सिंगापूरला रवाना केली आहे.

### राणेंच्या वक्तव्याला महाराष्ट्र गांभीर्याने घेत नाही– राऊत

मुंबई–नारायण राणे यांनी काय बोलावं आणि काय नाही बोलावे हे त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. त्यांच्या बोलण्याकडे महाराष्ट्र फार गांभीर्याने पाहत नाही. ज्या व्यक्तीने दोन–तीन वेळा पक्ष बदलले, स्वतःचा पक्ष चालवू शकले नाहीत, जे काँग्रेसमध्ये गेले, काँग्रेस पक्षाला शिव्या घातल्या. भाजपात गेले तर तिथेही त्यांचे नीट जमत नाही. शिवसेनेमध्ये शेवटी गोंधळ घातला. अशा व्यक्तीला महाराष्ट्र पण गांभीर्याने घेत असेल का असे वाटते का, असा उपरोधिक सवाल संजय राऊतांनी केला.

### यंदाच्या आषाढी एकादशीसाठी विठ्ठल–रखुमाईसाठी खास वस्त्र

नाशिक–यंदाच्या आषाढी एकादशीसाठी विठ्ठल–रखुमाईसाठी खास वस्त्र तयार करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेच्या अनुषंगाने खास वस्त्र तयार करण्यात आले आहेत. भाजप आध्यत्मिक आघाडीचे अध्यक्ष तुषार भोसले यांनी हे वस्त्र तयार केले आहेत. जांबळ्या आणि भगव्या रंगांमध्ये, शुद्ध रेशमाने हे वस्त्र तयार केले आहेत.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११.५० क्विंटल | २,४८१ | २,६०१ | २,५३० |
| ज्वारी/हायब्रिड : ३९.०० क्विंटल | १,९०० | २,७५१ | २,४६६ |
| मका/लोकल:३.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : २१.५० क्विंटल | ६,५५० | ६,६७२ | ६,६३० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ४३.०० क्विंटल | १,९५० | २,७०० | २,३९० |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:१४.५० क्विंटल | ४,२०० | ४,२५० | ४,२१६ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,५०० | ५,९०० | ५,७०० |







cmyk

## अग्रलेख

# रोजगार : कळीचा मुद्दा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेषतः उत्पादन क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यासाठी 'एम्प्लॉयमेंट लिंक्ड इन्सेंटिव्ह' योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणारे उद्योजक किंवा उत्पादक यांना आर्थिक स्वरूपात मदत देतानाच रोजगार स्वीकारणार्या युवकांनासुद्धा आर्थिक मदत देण्याची ही योजना देशातील बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी करेल, अशी आशा करायला हरकत नाही.


या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये अशा प्रकारच्या योजनेचे सूतोवाच करण्यात आले होते. ही घोषणा करण्यापूर्वी विविध कामगार संघटना, उद्योजक आणि इतर तज्ज्ञांशी चर्चा करूनच योजना अंतिम करण्यात आली आहे. प्रथमदर्शनी दिसत असणार्या या योजनेचे स्वरूप पाहून देशातील उत्पादकांनी आणि उद्योजकांनी या योजनेचे स्वागत केले आहे आणि रोजगार निर्मितीसाठी ही योजना गेम चेंजर ठरेल अशी आशाही व्यक्त केली आहे. सरकारने या योजनेसाठी तब्बल एक लाख कोटी रुपयांचा निधी तयार ठेवला आहे आणि या योजनेच्या माध्यमातून आगामी कालावधीमध्ये साडेतीन कोटी रोजगार निर्माण होईल अशी सरकारला आशा आहे.

एकंदरीत हे चित्र खूपच आशादायक आणि प्रोत्साहक दिसत असले, तरी या योजनेची अंमलबजावणी कशी होते यावरच सर्व काही अवलंबून राहणार आहे. नरेंद्र मोदी जेव्हा पहिल्यांदा पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी दरवर्षी किमान एक कोटी नवीन रोजगार निर्माण केले जातील, अशी घोषणा केली होती. मोदी यांना सत्तेवर येऊन आता ११ वर्षे झाली आहेत. म्हणजे या अकरा वर्षांच्या कालावधीमध्ये किमान ११ कोटी नवीन रोजगार निर्माण होणे अपेक्षित होते. पण तसे झालेले दिसत नाही. अकरा वर्षांच्या कालावधीमध्ये आणि आपल्या दोन्ही कारकिर्दीमध्ये नरेंद्र मोदी यांनी विविध योजनांची घोषणा केली.त्यामध्ये 'मेक इन इंडिया', 'स्टार्ट अप इंडिया' किंवा 'स्किल इंडिया' या सर्व योजनांचा हेतू रोजगार निर्मिती करणे हाच होता. आज काही वर्षांनंतर जेव्हा या सर्व योजनांचा आढावा घेतला जातो तेव्हा या योजनांकडून अपेक्षित असलेली रोजगार निर्मिती झाली नाही, असाच निष्कर्ष काढता येतो. या योजना काही प्रमाणात अपयशी ठरल्यामुळेच सरकारला ही नवीन रोजगारनिर्मितीशी निगडित प्रोत्साहन योजना आणावी लागली आहे हे उघड आहे. या योजनेच्या माध्यमातून रोजगार घेणारा आणि रोजगार देणारा या दोघांनाही सरकारकडून आर्थिक लाभ होणार असल्याने भविष्यात ही योजना अधिक यशस्वी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेतील सर्वात महत्त्वाचा घटक असलेल्या उत्पादन क्षेत्राची कार्यक्षमता वाढवण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या निमित्ताने छोट्या छोट्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन एकूण अर्थव्यवस्थेला रोजगार निर्मितीचा हातभार लागण्याची आशा सरकारला या योजनेच्या निमित्ताने वाटत आहे. भांडवल प्रधान उत्पादन क्षेत्रापेक्षाही श्रमप्रधान उत्पादन क्षेत्रासाठी ही योजना अधिक महत्त्वाची ठरणार आहे. छोट्या आणि लघु उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकते आणि प्रादेशिक विषमता कमी होऊ शकते. कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा रोजगार निर्मिती आणि जीडीपीमध्ये सर्वाधिक असतो. भारताचा विचार करता सध्या सेवा क्षेत्राचा वाटा जीडीपीमध्ये सर्वाधिक आहे.भारतीय अर्थव्यवस्था अजूनही प्राथमिक क्षेत्रावर म्हणजेच कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. हे चित्र बदलायचे असेल तर उत्पादन क्षेत्राची क्षमता वाढवणे गरजेचे आहे. उत्पादन क्षेत्रामध्ये होणारी भांडवली गुंतवणूक आणि त्यानिमित्ताने होणारी रोजगार निर्मिती अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लावू शकते. 'स्टार्ट अप इंडिया', 'स्किल इंडिया' किंवा 'मेक इन इंडिया' सारख्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक झाली नसली, तरी या नवीन योजनेमुळे उत्पादन क्षेत्रामध्ये ही सकारात्मक भावना पसरली आहे. त्याचा फायदा व्हायला हरकत नाही. युरोप किंवा अमेरिकेसारख्या बाहेरील देशांमध्ये नोकरी मिळवण्याचे जे आकर्षण भारतीय युवा वर्गामध्ये आहे तेसुद्धा कमी होण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरू शकते.कारण प्रथमच नोकरी करणार्या युवकांना या योजनेमध्ये अनेक आर्थिक सुविधा दिल्या जाणार आहेत. वरवर पाहता ही योजना खूपच आकर्षक आणि उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देणारी असली, तरी ठराविक कालावधीनंतर या योजनेचे मूल्यमापन होण्याची गरज आहे. ज्या प्रकारे गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये जाहीर करण्यात आलेल्या विविध योजनांमधून किती रोजगार निर्मिती झाली, त्याबाबत कोणतीच आकडेवारी समोर आली नाही तसे या योजनेबाबत होता कामा नये. या योजनेसाठी तब्बल एक लाख कोटी रुपयांचा निधी बाजूला ठेवला असल्याने योजना कोणत्याही परिस्थितीत यशस्वी करण्याची जबाबदारीसुद्धा आता सरकारला घ्यावी लागेल. अन्यथा इतर अनेक योजनांप्रमाणेच आणखी एक योजना, असा शिक्का या योजनेवर बसल्याशिवाय राहणार नाही.

# आय एम ए अंबाजोगाई व रोटरीच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात उत्स्फूर्त प्रतिसाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**रुग्ण व डॉक्टर यांच्यातील संवाद दृढ व्हावा यासाठी कार्यरत असणाऱ्या आयएमए संघटना शाखा अंबाजोगाई व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी च्या पुढाकाराने डॉक्टर्स डे च्या निमित्ताने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले या शिबिराला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या रक्तदान शिबिरात २६ जणांचे रक्तदान करण्यात आले.**



इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, जीवनदायी ब्लड बँक,भुतडा हॉस्पिटल, अंबाजोगाई क्लिनिकल लॅब संघटना , रोट्रॅक्ट क्लब अंबाजोगाई, विनोद भैय्या पोखरकर मित्रमंडळ यांच्या वतीने डॉक्टर्स डे चे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा( काकाजी) , आय.एम.ए चे सांस्कृतिक विभागाचे चेयरमन डॉ.राजेश इंगोले, दैनिक वार्ताचे संपादक परमेश्वर गित्ते,आय.एम.ए. अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे,सचिव डॉ.उद्धव शिंदे,रोटरीच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी,डॉ.अनिल भुतडा,डॉ. सौ.मनिषा भुतडा, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.सचिन पोतदार,यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.या माध्यमातून समाजाशी आय एम ए अंबाजोगाई हे संघटना सातत्याने रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व्हावा यासाठी काम करते आहे. शिवाय वैद्यकीय सेवा करत करत सामाजिक कार्यात सुद्धा ही संघटना कार्यरत आहे. सामाजिक दायित्व म्हणून रक्तदान शिबिरासारखे आयोजन या ठिकाणी केले जाते आहे ही अभिनंदन व कौतुकास्पद बाब असल्याचे सांगत रक्ताने नाते जोडण्याची किमया साध्य होते, असे मुंदडा यावेळी बोलताना म्हणाले. यावेळी डॉ.इंगोले , श्री परमेश्वर गित्ते यांनी रक्तदान करण्याचे महत्व तसेच आय एम ए, रोटरी च्या कार्याबद्दल विस्तृत मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी भूतडा हॉस्पिटल च्या वर्धापन दिनानिमित्त नंदकिशोर जी मुंदडा ( काकाजी ) यांच्या हस्ते डॉ अनिल भूतडा व डॉ मनीषा भूतडा यांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी डॉ.नवनाथ घुगे यांनी या रक्तदान शिबिराच्या आयोजनाची भूमिका सांगितली. संपूर्ण भारतामध्ये आयएमए संघटना कार्यरत असून त्याचे जाळे विस्तारलेले आहे. अंबाजोगाई शहरांमध्ये आयएमएच्या माध्यमातून वर्षभरात अनेक सामाजिक उपक्रम घेतले जातात, ज्याचा लाभ सामान्य व गोरगरीब रुग्णांना होत असतो. आम्ही सुद्धा माणूस आहोत आणि माणूस म्हणून काम करण्याची तयारी संपूर्ण डॉक्टरांनी जपलेली आणि जोपासलेली आहे. सामाजिक कार्य करत असताना समाज सुद्धा तेवढीच मदत आणि सहकार्य आम्हाला करत असतो. काम करत असताना त्यासाठी सहकार्याचे हात पाठीशी असावे लागतात आमच्या संपूर्ण सहकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. वर्षभर आम्ही जे काम करतो त्या कामाची पावती म्हणून डॉक्टर्स डे च्या निमित्ताने सामाजिक कृतज्ञता म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करत असतो. या माध्यमातून हे रक्त कुठल्या ना कुठल्या गंभीर रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी कामी यावे ही या मागची भूमिका असल्याचे डॉ. घुगे यांनी सांगितले. वर्षभरातील एकूण कामाचा आढावा डॉ.नवनाथ घुगे यांनी घेतला. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात २६ जणांनी रक्तदान केले.

या प्रसंगी ज्येष्ठ डॉ.एन.पी.देशपांडे,डॉ.ज्योती देशपांडे, डॉ शुभदा लोहिया, डॉ संदीप थोरात, डॉ अनिल भूतडा, डॉ मनीषा भूतडा, डॉ.दीपक लामतुरे, डॉ प्रल्हाद गुरव, आय एम ए चे उपाध्यक्ष डॉ विजय लाड, सचिव डॉ उद्धव शिंदे, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ सचिन पोतदार, डॉ बळीराम मुंडे, डॉ.अतुल शिंदे, डॉ. अरुणा केंद्रे, डॉ.मनिषा पवार, डॉ.प्रसाद कुलकर्णी, डॉ.विनोद जोशी, डॉ सुनील जाधव, डॉ दीपक पाटील, डॉ अमोल दहिफळे, डॉ विजय निकम, डॉ श्रीनिवास लांब, सौ संगीता नावंदर, रोटरी क्लबचे रो कल्याण काळे, रो धनराज सोळंकी, रो रमेश देशमुख, रो भीमाशंकर शिंदे, रो बालाजी घाडगे, रो जगदीश जाजू, रो गोरख बापू मुंडे, रोट्रॅक्ट क्लब च्या नूतन अध्यक्ष विशाखा बजाज, सचिव मयूर परदेशी, सर्वेश बजाज, रो मंदाकिनी गित्ते, श्री विनोद भैय्या पोखरकर, सचिन गौरशेटे, जीवनदायी ब्लड लॅबचे सूर्यकांत आघाव यांची उपस्थिती होती. आय एम ए चे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे यांनी रक्तदान करून सुरुवात केली तर रमेश देशमुख,रोहिणी पाठक ,मंदाकिनी गीते,राधेश्याम लोहिया ,बालाजी घाडगे,भीमाशंकर शिंदे,विनोद पोखरकर,संगीता नावंदर,

डॉ.मनिषा भुतडा, प्रकाश बोरगावकर यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले. यातील काही जणांनी ७२ वेळा तर काही जणांनी २८ वेळा रक्तदान करून विक्रम केला आहे.त्यांचाही सत्कार याप्रसंगी करण्यात आला.

## पान ६ वरून...

### महिलेला मारहाण करत

व माझ्या जावाला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत घराचा कडी, कोंडा तोडून साहित्यांची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेला ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना देवळाली येथे घडली असुन याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात कल्पना मुकूद वेदपाठक याच्या फिर्यादीवरून संजय शंकर कटके, मंगल संजय कटके, विठ्ठल शंकर कटके, ओंकारेश्वर चांगदेव कटके यांच्यावर अंभोरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) ३०५ (र), ११५ (२), ३५२, ३५१(२) ३२४ (२), ३ (५) नुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### श्री क्षेत्र पंढरपूर येथील मठ मंदिर

व आजी-माजी आमदार पंढरपूर,सोलापूर परिसरातील आमदार तसेच नगराध्यक्ष, उद्योजक,विविध ठिकाणचे नगरसेवक,विविध पक्षाचे पदाधिकारी,उच्चपदित अधिकारी,सरपंच-उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य यांची लाभणार आहे.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी,अंमळनेर,कोतन, गांधणवाडी, पांढरवाडी,भडकेल,खोपटी, डोंगरकिन्ही,जाटनांदूर,पांगरी परिसरातील अनेक भाविक पंढरपूर या श्री क्षेत्र ठिकाणी श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी पंधरवाडी,महिना एकादशी वारी,कार्तिक आषाढी,एकादशी उत्सवासाठी तसेच वेळ भेटेल तेव्हा मोठ्या संख्येने जातात.या परिसरातील भाविक-भक्तांची मुक्कामाची गैरसोय होऊ नये म्हणून महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांनी या परिसरातील भाविक-भक्तांसाठी हक्काचा मठ म्हणून भव्य-दिव्य महादेवानंद भारती बाबा मठ या नावाने उभारून भाविक-भक्तांना मोठा आधार प्राप्त करून दिला आहे.या भव्य-दिव्य मठात उन्हाळा,पावसाळा, हिवाळा मोसमात पंढरीत हजारोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांची मुक्कामाची व्यवस्था होणार आहे.श्री क्षेत्र पंढरपूर येथील शेगाव दुमाला या प्रशस्त परिसरात मठाची वास्तू उभारली आहे.

### छोटेवाडी येथे हरित क्रांतीचे प्रणेते

उपसरपंच बाळासाहेब चव्हाण,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा छोटेवाडीचे मुख्याध्यापक वगरे,ग्रामसेवक ताटे,कृषी महाविद्यालय पाथरीचे प्रा.भालेराव, लहामेवाडी शाळा समिती अध्यक्ष विनोद दळवी, तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कृषी महाविद्यालय पाथरीचे विद्यार्थी प्रदीप धनवडे, धनंजय लोंढे, गजानन अंडील, अजय मोरे,हरीश थावरे,विशाल थेटे, हनुमान जाधव व अमर भिसे यांनी शेतकऱ्यांना शेतीविषयक महत्त्वपूर्ण माहिती दिली.यामध्ये शेतकऱ्यांना ''पोखरा'', ''महाडीबीटी'', ''ई-पिक पाहणी'' यांसारख्या ऑनलाइन ॲप्सविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.आधुनिक शेती पद्धती व नविन तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना जागरूक केले गेले.माती परीक्षण करण्यात आले आणि त्यानुसार शिफारसी देण्यात आल्या.पर्यावरण रक्षणाचा संदेश देत वृक्षारोपणही करण्यात आले.हा उपक्रम गावकऱ्यांचा आणि विद्यार्थ्यांचा परस्पर संवाद वाढवणारा ठरला.ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पान ६ वरून...

### अंबाजोगाई तालुक्यात

वीज बिल भरण्याची ऑनलाइन पद्धत

ऑनलाइन पद्धतीचा वापर करून देयकाची रक्कम भरण्यासाठी वीज ग्राहकाने सर्व प्रथम महावितरणच्या संकेतस्थळावर जावे . येथे कंझुमर पोर्टल आहे. या ठिकाणी क्लिक केल्यावर आपल्या ग्राहक क्रमांक आणि उपविभागाचा सांकेतिक क्रमांक टाकावा. या नंतर येणा - या सूचनांचे पालन करून डेबिट , क्रेडिट कार्ड , ऑनलाइन बँक अमाऊंट , ई वॅलेटचा वापर करून पैसे भरावे . आपला व्यवहार पूर्ण झाला की महावितरणकडे नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस येतो . यावरून आपला व्यवहार पूर्ण झाल्याची खात्री करता येते . सुरुवातीला केवळ वीज देयकाची रक्कम भरणारे वीज ग्राहक आता स्मार्ट झाल्याने वीज बिलासोबतच नवीन वीज जोडणीसाठी लागणारे शुल्क , सुरक्षा ठेव , अतिरिक्त सुरक्षा ठेव , वस्तू सेवा कर , करार शुल्क , सोलर रुफटॉप शुल्काचा भरणादेखील ऑनलाइन करीत आहेत

विद्युत ग्राहकांनी ऑन लाईन पद्धत वापरून बील भरणा केल्याने वसुलीसाठी कर्मचा-यांना फारसे फिरावे लागत नाही. त्याचबरोबर ग्राहकांची मोठी सोय झाली आहे. ऑनलाईन पद्तीमूळे विद्यूत ग्राहकांचा वेळ व पैसा दोन्ही वाचला आहे. जास्तीत जास्त ग्राहकांनी या सेवेचा उपयोग घ्यावा.

\- सतीश कानडे

(उपकार्यकारी अभियंता,अंबाजोगाई)

### अंबाजोगाईच्या ऊसतोड

नुकताच आदित्य जाधवचा शाल व फेटा बांधून सन्मान करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना राजकिशोर मोदी म्हणाले की अशा मेहनती, जिद्दी आणि संघर्षातून वर आलेल्या मुलांना वेळेवर योग्य दिशा आणि पाठबळ दिलं, तर तेभविष्यात देशाचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच उज्वल करतात. आदित्य सारख्या मुलांमधूनच नव्या भारताची उमेद आहे. त्याचे यश हे केवळ अंबाजोगाई शहरासाठीच नव्हे तर संपूर्ण भारत देशासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे मोदी यांनी या सत्कार प्रसंगी नमूद केले. त्याच्याकडून भविष्यात देखील ऑलिम्पिक मध्येही पदक मिळवण्याची अपेक्षा आपण नक्की बाळगू शकतो असा विश्वास देखील राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. यावेळी आदित्यच्या पालक, प्रशिक्षक व त्याच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन व कौतुक राजकिशोर मोदी यांनी केले आहे. आपल्या सत्काराला उत्तर देतांना आदित्यने काटेकोर प्रशिक्षण, आहार, नियमित व्यायामासोबतच योग्य प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती यांच्या जोरावरच आपन हा यशस्वी प्रवास केला असल्याचे सांगितले.क्रीडा क्षेत्रात अडथळे असले तरी हार न मानता चिकाटीने पुढे जाण्याची जिद्द ठेवण्याचे आवाहन यावेळी आदित्य जाधव याने केले आहे . त्याच्या या यशस्वी व दैदिप्यमान कामगिरीमुळे अंबाजोगाईच्या तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. या सत्कार प्रसंगी आदित्यच्या नातेवाईकासह माजी नगरसेवक दिनेश भराडिया, दत्ता सरवदे, रफिक गवळी, विजय रापतवार, वजीर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राजकिशोर मोदी यांनी आदित्यच्या यशाचं कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून...

### पालकमंत्री अजित पवारांच्या

येथे औद्योगिक क्षेत्रात 'सीट्रिपलआयटी' सुरु करण्यासाठी 'एमआयडीसी'ला योजना अभिकर्ता म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. शिर्डी येथील 'सीट्रिपलआयटी'साठी एमआयडीसीने निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याच धर्तीवर बीड येथील 'सीट्रिपलआयटी'साठीही एमआयडीसीने निधी उपलब्ध करुन देण्याचा तसेच योजना अभिकर्ता म्हणून जबाबदारी पार पाडण्याचा निर्णय एमआयडीसीच्या संचालक मंडळाने घेतला आहे. एमआयडीसीचा हा निर्णय बीड जिल्ह्यातील युवकांना रोजगार, स्वयंरोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्य विकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी या वर्षाच्या सुरुवातीला घेतला होता. त्यासाठी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनी बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करणार आहे. कंपनीने तशा आशयाचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे. या नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाणार आहे. यामुळे बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या निर्णयक्षम कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्वीकारल्यापासून त्यांनी जिल्ह्यासंदर्भात धडाडीने निर्णय घेण्यास आणि नियोजित वेळेत यशस्वी अंमलबजावणी करण्यास सुरुवाता केली आहे. पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी २ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या बीड जिल्ह्याचा दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी उद्योग क्षेत्राच्या मदतीने 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्राला 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करण्याची तयारी दर्शविली. १९१ कोटींपैकी १५ टक्के म्हणजे ३३ कोटी रुपयांचा खर्च बीड जिल्हा प्रशासन करणार असून उर्वरित खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि त्यांच्या भागीदार कंपन्या, संस्था उचलणार आहेत. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीआयआयआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे. 'सीआयआयआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून उचलणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल जिल्ह्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### अजितदादांमुळे बीड

यांनी अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

बीडमध्ये सीट्रिपलआयटी प्रकल्पासाठी ४,००० चौ. मी. जागा मंजूर करण्यात आली आहे. एमआयडीसीकडून जागा देण्यासाठी आणि प्रक्रिया पूर्ण करण्याचा यि घेण्यात आला आहे. हा १९१ कोटींचा प्रकल्प असून, टाटा टेक्नॉलॉजीकडून पुढाकार घेण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी सुमारे ७,००० युवकांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. जिल्हा प्रशासन या प्रकल्पासाठी ३३ कोटींचा खर्च उचलणार असून, प्रशिक्षणाचा खर्च पहिल्या तीन वर्षांसाठी टाटा टेक्नॉलॉजीकडून केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे उद्योग आणि रोजगाराच्या संधीमध्ये बीड जिल्ह्यात नवा अध्याय सुरू होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील तरुणांना रोजगार, कौशल्यविकास आणि नवीन तंत्रज्ञान प्रशिक्षणाची संधी मिळणार असून जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळणार आहे, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त करत अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. तसेच, जिल्ह्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रात स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणार असून औद्योगिक वातावरण विकसित होईल, असेही म्हटले आहे.

### अर्वाच्य भाषेत

सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं. ३६४/ २०२५ कलम ७८, ७९, २२१ बीएनएस २०२३ नुसार विनयभंग व काम करून घेण्यासाठी दबाव तंत्राचा वापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही. एस. मोरे हे करत आहे.

### लक्ष्मण हाकेंची हालत

जाणीवपूर्वक लक्ष्मण हाके स्टंटबाजी करत आहेत. राष्ट्रवादी युवक काँग्रेस त्यांची चड्डी पिवळी केल्याशिवाय राहणार नसल्याची टीका राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी केली. पुढील आठ दिवसात लक्ष्मण हाकेची चड्डी पिवळी करण्याची जबाबदारी राष्ट्रवादी आहे. लक्ष्मण हाकेंची हालत भटक्या कुत्र्यासारखी करु असा इशाराही चव्हाण यांनी दिला आहे.

लक्ष्मण हाकेला महाराष्ट्रात फिरु देणार नसल्याचा इशारा देखील सुरज चव्हाण यांनी दिला आहे.

**नेमकं काय म्हणाले लक्ष्मण हाके?**

लक्ष्मण हाके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. अजित पवार यांच्या अर्थ खात्याकडून ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, असा लक्ष्मण हाके यांचा आरोप आहे. याउलट मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आणि सारथी संस्थेला पैसे दिले जातात. पण महाज्योती संस्थेला पैसे दिले जात नाहीत. तसेच ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही, असा आरोप लक्ष्मण हाके आणि त्यांच्या समर्थकांचा आहे.

### आषाढी एकादशीला भाविकांची

नारायणगड येथे येणाऱ्या भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी, आरोग्य पथकांची नेमणूक करण्याबाबतही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना कळविले आहे. यासोबतच श्री क्षेत्र नारायणगड येथे ४,५,६,७ जुलै रोजी अखंडित वीजपुरवठा सेवा देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही महावितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी सूचित केले आहे.

### तुळजाभवानी मंदिर परिसरात

कानउघडणी करण्यात आली होती. मात्र तरीही पुजाऱ्यांच्या वागण्यात बदल झाला नव्हता आणि अशोभनीय वर्तन सुरु होते. मात्र या नोटीशींना समाधानकारक उत्तर न दिल्याने प्रशासनाने कठोर पाऊल उचलले आहे.

सहा पुजाऱ्यांनी नोटीसीला उत्तर देऊन मंदिर संस्थानकडे

माफीनामा सादर केला होता. यामध्ये लखन भोसले, अक्षय किशोर कदम भैय्ये, विशाल चव्हाण, धीरज चोपदार, वैभव भोसले, राहुल पवार यांचा समावेश आहे. माफीनामा देणाऱ्या सहा पुजाऱ्यांवर एक महिन्यासाठी प्रवेश बंदी घालण्यात आली आहे, तर नोटीशीला उत्तर न देणाऱ्या दोघांवर तीन महिन्याची मंदिर प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. नोटीसला उत्तर न देणाऱ्यांमध्ये विशाल दादासाहेब मगर आणि विशाल बाळासाहेब गंगणे यांचा समावेश आहे.

अशोभनीय व मंदिराच्या शिस्तीस बाधा आणणं तसेच कायदा व सुव्यवस्थेत अडथळा निर्माण केल्याप्रकरणी मंदिर संस्थांनाने देऊळ कवायत कायद्यानुसार कारवाई केली आहे.

### आरोग्य विभागाच्या विविध

गंडाळ, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेशकुमार माने, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमृता मुळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी आदींसह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राऊत व डॉ. गंडाळ यांनी आरोग्य विभागांतर्गत सेवा देण्यात असलेल्या विविध सेवांचा तपशील यावेळी सादर केला. आरोग्य सेवा देत असलेले सर्व कार्यक्रम प्रमुख यांनी आपापल्या विभागातील कामकाजांबाबत सविस्तर माहिती सादर केली.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.४ जुलै २०२४


## मतदानादिवशी माजलगाव येथील मोंढा बंद

माजलगाव । प्रतिनिधी
लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी दिनांक १३ मे रोजी मतदान होणार आहे यामुळे सोमवारी माजलगाव बाजार समितीचे नवीन मोंढा फुले पिंपळगाव येथील सर्व शेतीमालाचा जाहीर लिलाव (बीट )बंद राहील याची तालुक्यातील शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे सोमवार दिनांक १३ मे २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी जास्तीत जास्त मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा या दृष्टिकोनातून माजलगाव परिसरातील शेतकरी बांधवांनी १३ मे सोमवार रोजी मोंढा बंद असल्याने शेतकरी बांधवांनी आपला शेतीमाल विक्रीसाठी आणू नये असे आवाहन बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

# चार कोटी खर्च करुन रस्त्याची एका महिन्यातच झाली दुरावस्था

## धुनकवाड ते उपळी रस्त्याचे काम झाले निकृष्ट दर्जाचे.; मा.खा.डॉ.प्रितम मुंडे यांच्या हस्ते झाले होते उद्घाटन

धारुर। प्रतिनिधी
धारुर तालुक्यातील धुनकवाड नं.२ते उपळी हा रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत झाला असून गेल्या एक महिनाभरापूर्वी याचे काम पूर्ण झाले आहे.या पाच किलोमीटरच्या रस्त्यावर ४ कोटी ८ लाख ९६हजार रुपये खर्च करण्यात आले असून एका महिन्यातच या रस्त्याची दुरवस्था झाली आहे हा रस्ता खचला असुन दर्जाहीन केला असल्याने गुत्तेदार व प्रशासनाच्या विरोधात ग्रामस्थात संतप्त प्रतिक्रिया येत आहेत.



प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ही केंद्र सरकारची एक योजना आहे ज्याचा उद्देश ग्रामीण भागातील वस्त्या,वाड्या तांडे मुख्य रस्त्यांना जोडणे हा आहे.या योजनेअंतर्गत ५०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या भागांमध्ये२५० किंवा त्यापेक्षा जास्त वस्त्यांना रस्त्यांची जोडणी ज्यामुळे या वस्त्या मुख्य रस्त्यांशी जोडल्या जातील.

धुनकवाड नं.२ते उपळी ह्या रस्त्याची दयनीय अवस्था झाली होती गेल्या तीस वर्षापासून या गावाला चांगला रस्ता नव्हता तरी मा.खा. डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत या रस्त्यासाठी मंजुरी मिळवली व यासाठी चार कोटी रुपयांचा निधीही मंजूर करून आणला व त्याचे उद्घाटनही मा.खा.प्रीतमताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी या रस्त्यावरून उद्घाटनाला येताना त्यांना या रस्त्याची अवस्था दिसली व त्यांनी जो निधी दिला तो योग्य ठिकाणी पोहोचला याचं त्यांनी समाधान व्यक्त केलं होतं परंतु हा रस्ता दर्जाहीन झाला असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. कारण या रस्त्यावरून गाळाचे टिप्पर मोठ्या प्रमाणात सुरू असून एका महिन्यातच या रस्त्याची बिकट परिस्थिती झाली आहे. या रस्त्याची दुरवस्था झाली असून हा रस्ता पुर्णपणे खचला असल्याने संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्याची पाहणी करून रस्त्याचा दर्जा तपासावा अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे. माजलगाव मतदार संघातील धुनकवाड नं.२ते उपळी हा रस्त्यावर ४ कोटी ८ लाख ९६ हजार रुपये खर्च करून हा रस्ता केला आहे परंतु एका महिन्यातच हा रस्ता खचला असुन गुत्तेदार व प्रशासनावर आमदार प्रकाश दादा सोळंके यांची वचक राहिली नाही व याकडे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे दुर्लक्ष होत आहे.तरी या कामाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पाच किलोमीटरच्या कामासाठी तब्बल चार कोटी रुपये खर्च केले असून या रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण केल्याने रस्त्यावर खड्डे पडले असून हा रस्ता खचला असल्याने पावसाळ्यात जनतेचे हाल होणार आहेत.

संपूर्ण झालेल्या कामाची चौकशी करून संबंधित गुत्तेदार व अभियंता यांच्यासह दोषींवर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

### तहसीलदारांना पत्र दिले पण कारवाई काहीच नाही...

प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत ५४८ते धुनकवाड नं.२-उपळी रस्ता साई कन्स्ट्रक्शन कंपनीने रस्त्याचे डांबरी काम पुर्ण झाले आहे हा रस्ता ग्रामीण रस्ता असून या रस्त्याची वजन सहन करण्याची क्षमता आठ टन आहे.तरी जास्त वजनाचे वाहन (टिपर) वाहतुक झाली तर रस्ता खरब होण्याची शक्यता आहे.असे पत्र महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणा बीड या कार्यालयानी धारूर व वडवणी तहसीलदारांना दिले होते.तरी सुध्दा गेल्या आठ दिवसांपासून या रस्त्यावरुन गाळाचे टिप्पर चालु आहेत मग तहसीलदारांनी काहीच कारवाई केली नसल्याने याकडे ही संशय बळावतो.

### महसूल प्रशासनाचे हात ओले झाल्याने हात झटकले

गेल्या आठ दिवसापासून धुनकवाड नं.२ ते उपळी या रस्त्यावरून अवैध गाळाचे टिप्पर रात्रंदिवस चालू असून धारूर महसूल हद्दीत धुनकवाड नं.२येथील वनविभागाच्या रोपवाटिकेजवळ मोठा गाळसाठा करून ठेवला असून हा लाखो रुपयांचा गाळ विटभट्टी धारकांना विकला जात असुन संबंधित महसूल विभागाचे कर्मचारी व अधिकारी यांना माहिती दिली असताना उडवा उडवीचे उत्तर दिले जात असल्याने त्यांनी ही हात झटकले असुन त्यांचे ही हात ओले झाले असल्याची चर्चा नागरिकांत सुरू आहे.फ

## तलाठ्याची माणुसकी : डॉक्टरांनी वाचविले गाईचे प्राण

पाटोदा । प्रतिनिधी
गुरूवारी सकाळच्या शांततेत एक आवाज दाटून आला मदतीची हाकेचा. तहसील कार्यालयाच्या आवारात पडलेल्या गाईंच्या करुण अवस्थेनं आज काही मनं हलवून टाकली... आणि मग घडली एक अशी घटना, जी केवळ एक बातमी नव्हे, तर सामाजिक भान आणि तत्परतेचा आदर्श ठरली.सकाळी सहाच्या सुमारास व्यायाम करण्यासाठी बाहेर पडलेले पाटोदा तालुक्यातील तलाठी बाबर साहेब, तलाठी शिवणकर साहेब,पोस्ट कर्मचारी बुधवंत साहेब, व्यापारी सुजित कोल्हे आणि आबा वराडे या मित्र मंडळींनी पाटोदा तहसील कार्यालय आवारात गावरान खिलारी गाई गटांगळ्या खात, जमिनीवर अंथरुणाला खिळलेल्या अवस्थेत पाहिली. क्षणभर थबकले... पण पुढे गेले नाहीत ते मित्र थांबले, विचार केला आणि कृती केली.



ते म्हणाले, ''आपण प्रशासनाचा भाग आहोत, पण त्याही आधी माणूस आहोत.''त्यांनी तात्काळ पाटोद्यातील पशुवैद्यकीय डॉक्टरांना संपर्क साधला. प्रतिसादही तितकाच झपाट्याचा डॉ. अण्णा गोरे, डॉ. नरेंद्र जावळे आणि डॉ. हरिदास शेलार व ओम गोरे हे अनुभवी डॉक्टर काहीच वेळात घटनास्थळी दाखल झाले.गाईंची स्थिती तपासून त्यांनी औषधोपचार, सलाईन आणि आवश्यक मदतीची तत्काळ सोय केली. काही वेळातच गाईंची प्रकृती स्थिर झाली आणि त्यांना पुढील निगराणीखाली हलवण्यात आले.ही फक्त एक मदत नव्हती, ती होती एक भूमिका जाणीवेची आणि जबाबदारीची. या घटनेतून काही गोष्टी ठळकपणे पुढे येतातः सामाजिक जाणीव: संकटात असलेल्या निराधार जीवांची वेदना ओळखून मदतीचा हात पुढे करणं हीच खरी सामाजिक बांधिलकी.तत्परता: वेळेवर निर्णय घेणं आणि कृतीत उतरवणं तलाठी व डॉक्टर मंडळींनी हे उत्तम दाखवून दिलं.सामूहिक जबाबदारी: प्रशासन, नागरिक आणि सेवाभावी वृत्ती यांचं योग्य मिश्रण हेच समाजाचं खऱ्या अर्थानं बळ आहे.आज पाटोद्यात गाई वाचली... पण त्याच वेळी एक गोष्ट पुन्हा अधोरेखित झाली ''माणुसकी अजूनही श्वास घेत आहे... आणि ती इथे, आपल्या पाटोदा गावात जिवंत आहे.''

## रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढणार-आ.लोणीकर

जालना। प्रतिनिधी
राजकारण आणि समाजकारणामध्ये गेली ४० वर्ष मी शेतकऱ्यांच्या बाजूने भूमिका मांडलेली आहे त्यासाठी शेतकऱ्यांचे २५-२५ हजार लोकांचे मोर्चे काढले आहेत. शासन आणि प्रशासनाला शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर धारेवर धरला आहे त्यामुळे आम्ही शेतकऱ्यांविरोधी भूमिका मांडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही मी शेतकरी विरोधी बोललेलो नाही परंतु माझ्या बोलण्याचा विपर्यास करत विरोधकांना केवळ राजकारण करायचं आहे यापूर्वी मी शेतकऱ्यांसाठी लढा दिलेला आहेच आणि रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मी शेतकऱ्यांसाठी लढत राहणार आहे. माझ्या मृत्यूनंतर माझ्या हाडांना कान लावून ऐकलं तर त्यामधून सुद्धा मी शेतकरी



असल्याचा आवाज येईल अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत अत्यंत आक्रमकपणे आपली भूमिका मांडली.

विधानसभेत बोलत असताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की विरोधक केवळ राजकारण करण्याच्या उद्देशाने माझ्या बोलण्याचा विपर्यास करत आहेत मी जे बोललो ते काही विशिष्ट लोकांसंदर्भात बोललो आहे शेतकऱ्यांसंदर्भात नाही परंतु पराचा कावळा करत विरोधकांनी महाराष्ट्रभर फेक नरेटीव च्या माध्यमातून मी शेतकरी विरोधी वक्तव्य केले असल्याचा कांगावा करत आहेत. मी स्वतः शेतकऱ्यांचा मुलगा असून शेतकऱ्यांच्या भावना मी जाणतो, शेतकऱ्यांसाठी वारंवार रस्त्यावर उतरणारा आणि शेतकऱ्यांच्या बाजूने कायम भूमिका घेणारा मी कार्यकर्ता आहे त्यामुळे मी शेतकरी विरोधी वक्तव्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असेही आमदार बबनराव लोणीकर विधानसभेत म्हणाले. माझ्या बोलण्याचा विपर्यास करून विरोधक केवळ त्यांची राजकीय पोळी भाजण्याचे काम करत आहेत परंतु मी यापूर्वी ही कधी शेतकरी विरोधी बोललेलो नाही आणि यापुढे देखील बोलणार नाही. माझ्या बोलण्यामुळे शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या असतील तर मी शेतकऱ्यांची हजार वेळी माफी मागायला तयार आहे. शेतकऱ्यांची माफी मागत असताना त्यात लाज कसली, मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे. मी ४० वर्ष शेतकऱ्यांमुळे राजकारण आणि समाजकारणामध्ये आहे त्यामुळे शेतकरी विरोधी वक्तव्य माझ्याकडून कधीही निघणार नाही परंतु केवळ राजकारण करू पाहणाऱ्या विरोधकांची माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत ठणकावून सांगितले.

## कामखेडा येथे कृषीदुतांनी पटवुन दिले सूक्ष्मअन्नद्रव्यांचे महत्त्व



कामखेडा । प्रतिनिधी
पिक उत्पादनात सुधारणा घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांनी केवळ प्रमुख अन्नद्रव्येच नव्हे तर सूक्ष्मअन्नद्रव्यांचेही महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे. अलिकडच्या काळात अनेक शास्त्रज्ञ व कृषी तज्ज्ञ सूक्ष्मअन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे पिकांची वाढ खुंटते, उत्पादनात घट येते आणि गुणवत्ता कमी होते, याकडे लक्ष वेधत आहेत. सूक्ष्मअन्नद्रव्यांमध्ये लोह , झिंक , मँगनीज , बोरॉन , मोलिब्डेनम , तांबे आणि क्लोरीन यांचा समावेश होतो. ही अन्नद्रव्ये अत्यल्प प्रमाणात लागतात, पण त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. उदाहरणार्थ, झिंकची कमतरता मुळे पानांची वाढ खुंटते, तर बोरॉनच्या कमतरतेमुळे फळधारणेवर विपरित परिणाम होतो.

शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून आवश्यक सूक्ष्मअन्नद्रव्यांची कमतरता ओळखून योग्य ते खतांचा वापर करावा. यामुळे पिकांची प्रत सुधारते, उत्पादनात वाढ होते आणि शाश्वत शेतीला चालना मिळते. कामखेडा येथे सूक्ष्मअन्नद्रव्यांच्या समतोल वापराबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी कृषीदूत व्यंकटेश कदम, युवराज खाडे, किशोर मलपुरे, योगेश कुटे, ऋत्विक सोन्नर श्रीकृष्ण शिंदे फारुक शेख व मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी.मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ.एस.टी. शिंदे, प्राचार्य.बी.आर. चादर, ए. जी. गार्डी, कार्यक्रम अधिकारी एस. एस. राठोड व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

## महासांगवी शाळेमध्ये शालेय आरोग्य शिबिर

महासांगवी। प्रतिनिधी
येथे आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी शाळेमध्ये शालेय आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते संबंधित आरोग्य शिबिरामध्ये शाळेतील विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांचे हिमोग्लोबिन तपासणी तसेच विद्यार्थ्यांसाठी आरोग्यदायक चांगल्या सवयी याबाबत श्री डॉक्टर रवींद्र गोरे साहेब समुदाय आरोग्य अधिकारी पाटोदा आणि



श्री पवार साहेब जिल्हा आरोग्य तपासणी अधिकारी बीड यांनी मार्गदर्शन करून सर्व विद्यार्थी आणि पालक यांचे हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विशाल गर्जे हे होते तसेच उपाध्यक्ष श्रीमती कालींदा प्रशांत सानप तसेच मौजे महासांगवी गावचे प्रथम नागरिक आदरणीय सरपंच श्रीमती चैत्राली नामदेव सानप तसेच श्री युवा उद्योजक श्री नामदेव सानप आणि शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते सदरील कार्यक्रम यशस्वी घेण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रवीण धापसे शाळेतील श्री गोपाळघरे सर, श्री आरेकर सर, श्रीमती काळे मॅडम हे सर्व शिक्षक वृंद आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष, आणि सदस्य यांनी विशेष प्रयत्न केले

जाहीर प्रगटन
**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०२०/२०२५**
CNR No. MHBI02000020702025
**(मार्फत अँड व्ही एम. पवळ)**
**प्रयागाबाई मधुकर कुंभार व इतर ६ वि. निरंक**
अर्जदार : १ प्रयागाबाई भ्र. मधुकर कुंभार, वय ६७ वर्षे, धंदा घरकाम, रा. येळबंघाट ता. जि. बीड, २. गणेश पि मधुकर कुंभार, वय ४१ वर्षे धंदा शेती, रा सदर, ३ शंकर पि मधुकर कुंभार, वय ४२ वर्षे धंदा शेती, रा. सदर, ४ रत्नमाला भ्र. वंसत शिंदे, वय-४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. येळबघाट ता. जि. बीड, ५. सुषमा भ्र. बाबुराव कुंभार , वय ३९ वर्षे धंदा घरकाम, रा. जोगेश्वर, छत्रपती संभाजीनगर ता. जि छत्रपती संभाजी नगर, ६ अभिषेक पि. बाबुराव कंभार, वय-२० वर्षे, वर्षे, धंदा शिक्षण, रा. मेहकर ता मेहकर जि. बुलढाणा, ७. कल्याणी पि बाबुराव कुंभार, वय-१७ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अपाक आई अर्जदार के ५ रा सदर
विरुध्द निरंक
मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ७ यानी या न्यायालयात मयत मधुकर किसन कुंभार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत मधुकर किसन कुंभार याचा मृत्यु दिनाक ०७/१०/२०२१ रोजी जिल्हा रुग्णालय बीड ता.जि बीड येथे त्याचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले व अर्जदार क. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे व अर्जदार क. ५ ही मयताचा मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सून आणि अर्जदार क. ६ व ७ हे मयताचे नातु म्हणजे मयताच्या मयत मुलाचे मुलं आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत
मयत मधुकर किसन कुंभार याचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.
त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यानी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवाची जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी प्रकरणातील पुढील तारीख ३१/०७/२०२५
आज दिनाक ०२ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
स्वाक्षरित
**क. लिपीक**
आदेशावरुन,
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
सहदिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

जाहीर प्रगटन
**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०२४/२०२५**
**ॲड. आर. के. बडे यांचे मार्फत**
**आश्रुबा वि. निरंक**
ज्याअर्थी - तुळसाबाई भ्र. कुंडलीक पवार, हया दिनांक ०४.०६.२०२४ रोजी बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. त्याअर्थी १ आश्रुबा पि. कुंडलीक पवार, वय ७८ वर्षे, धंदा- शेती रा. पालवन, ता. जि. बीड २. विजूबाई पि. कुंडलीक पवार, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम रा. पालवन, ता. जि. बीड, ३. भिमाबाई भ्र. रंगनाथ जाधव, वय ७४ धंदा घरकाम रा. कुंभारवाडी, ता. गेवराई जि. बीड अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ व ३ या मयताच्या मुली आहेत, असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना/अर्जदाराला सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**प्रकरणाची पुढील तारीख ०७.०८.२०२५ ही आहे.**
**आज दिनांक ०२.०७. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**
स्वाक्षरित
**क. लिपीक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर, बीड
आदेशावरुन,
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

जाहिर प्रगटन
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९०**
**दिनांक -०२/०७/२०२५**
तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती चरणसिंग भगवानसिंग राजपुत रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | दिपक चरणसिंग राजपुत | मुलगा | २५/०९/२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक-०२/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.
**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**टीसी हरवला आहे**
अनिकेत सुग्रिव यमगर या नावाचा ४ थी पास चा टीसी माजलगाव ते पाथरी प्रवासादरम्यान हरवला आहे कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.
**संपर्क**
**९७६४५४१३४४**

**टीसी हरवला आहे**
किशोर माधव रांजवन रा. वाघिरा यांचा १०वी पास चा टी सी. पाटोदा ते मांजरसुंबा प्रवासादरम्यान हरवला आहे सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा .
**संपर्क**
**९३२६६३३२२५**

# शेतीमधील मनुष्यबळ कमी करणे गरजेचे

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे प्रतिपादन

मुंबई : शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नतीसाठी आमचे प्रयत्न आहेत. जोवर मानवविरहित शेती केली जाणार नाही तोवर ती फायद्यात राहणार नाही. यासाठी 'एआय'च्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) माध्यमातून शेतीमध्ये प्रयोग केले जातील, असे प्रतिपादन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले. वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने यशवंतराव चव्हाण सेंटर येथे कृषी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी मंत्री कोकाटे बोलत होते. या वेळी मनोज कापडे यांना कृषी पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यासह अन्य १६ कृषी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

या वेळी कोकाटे म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या जीवनात जिव्हाळा फुलविण्याचे आणि आर्थिक प्रगती आणण्याचे श्रेय वसंतराव नाईक यांना जाते. त्यांनी दुष्काळात सुरू केलेली रोजगार हमी योजना केंद्र सरकारने स्वीकारली. तर अन्नधान्यात स्वयंपूर्ण करण्यासाठी घेतलेले धोरणात्मक निर्णय आजही पथदर्शी आहेत. या पुढील काळात तंत्रज्ञान आधारित शेती करणे गरजेचे आहे. जोवर शेतीतील मनुष्यबळाचा वापर कमी करत नाही तोवर आपल्याला शेती फायद्यात आणता येणार नाही. या आधी शाश्वत शेतीमुळे शेतकरी आत्महत्या होत नव्हत्या. मात्र, अलिकडे सामाजिक वीण



उसवल्याने आणि शेतीतील खर्च वाढल्याने हा प्रश्न गंभीर बनला आहे. या पुढील काळात आपल्याला रासायनिक खतांचा बेसुमार वापर टाळून विषमुक्त शेती केली पाहिजे. आपण किती पिकवतो यापेक्षा कोणत्या दर्जाचे पिकवतो यावर आपला भर असला पाहिजे.'' या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र बारवाले म्हणाले, ''हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त सतत ४० वर्षे कृषी क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित केले जाते. त्यांनी राबविलेले अनेक उपक्रम देशपातळीवर स्वीकारले गेले. ज्या शेतकऱ्यांनी चांगले काम केले आहे, त्यांना सन्मानित केले आहे. त्यांनी केलेल्या प्रयोगाचा मोठा फायदा राज्यातील इतर शेतकऱ्यांना होईल. आधुनिक तंत्रज्ञानातून जगाची अन्नसुरक्षा निश्चित करता येऊ शकेल.''


### यांचा झाला सन्मान

या वेळी विज्ञान व तंत्रज्ञान संशोधन केंद्र गडचिरोलीला एक लाखाचा सामाईक पुरस्कार, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा यांना उल्लेखनीय योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या व्यतिरिक्त कृषी शास्त्रज्ञ व साहित्य पुरस्कार : डॉ. दिलीप घोष, कृषी निर्यात पुरस्कार : उळे शेतकरी उत्पादक कंपनी, फलोत्पादन पुरस्कार :हनुमंत गावडे, भाजीपाला व रोपवाटिका संवर्धन पुरस्कार : नानाजी जाधव, दुग्धव्यवसाय व पशुसंवर्धन पुरस्कार : भाऊसाहेब भोसले, जलसंधारण पुरस्कार : उपेंद्र धोंडे, आधुनिक फुलशेती पुरस्कार : गणेश वाघ, आधुनिक स्टार्टअप पुरस्कार : महेक अली आणि सय्यद अली, सामाजिक वनीकरण पुरस्कार : शेखर गायकवाड, महिला केंद्रित ग्राम विकास पुरस्कार : इंदुजा महिला दुग्ध उत्पादक कंपनी, पुनर्जिवित शेती पुरस्कार : रामचंद्र पुंड, नाविन्यपूर्ण शेतकरी पुरस्कार : रोहन उरसाल, कृषी प्रक्रिया पुरस्कार : विनोद जोगदंड यांना प्रदान करण्यात आला.

# कांदा मर रोग नियंत्रण

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी कांदा हे महत्त्वाचे नगदी पीक आहे. परंतु, कांदा मर रोग हा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणारा प्रमुख रोग आहे. फ्युजेरियम विल्ट आणि आर्द्र मर हे या रोगाचे दोन प्रमुख प्रकार आहेत, ज्यामुळे कांदा पिके सुकून जातात आणि उत्पादनात घट होते. योग्य व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब केल्यास हा रोग नियंत्रित करता येतो. कांदा मर रोगाचे प्रमुख कारणे : जमिनीतील ओलावा आणि पाणी साचणे हे मुख्य कारणे आहेत, ज्यामुळे बुरशीजन्य संसर्ग वाढतो. जास्त नत्रयुक्त खतांचा वापर केल्यामुळे पिकाची प्रतिकारशक्ती कमी होते. योग्य बीजप्रक्रियेचा अभाव आणि खराब माती व्यवस्थापन यामुळेही रोगाचा प्रसार होतो.

माती व्यवस्थापन : वाफ तयार करताना प्रत्येक वाफ्यात ८-१० किलो चांगले कुजलेले शेणखत आणि ५० ग्रॅम धानुकोप मातीमध्ये मिसळून घ्यावे. यामुळे बुरशीजन्य रोगांपासून मातीचे संरक्षण होते. बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २-३ ग्रॅम बाविस्टीन आणि थियामेथोक्सम ३०% एफएस २ मिली याची बीजप्रक्रिया करणे खूप महत्त्वाचे आहे. यामुळे बियाण्यांचे संरक्षण होते आणि प्रारंभिक कांदा मर रोग नियंत्रित करता येतो. जैविक नियंत्रण



: रोगाच्या प्राथमिक अवस्थेत २ लिटर ट्रायकोडर्मा व्हिरीडी २०० किलो चांगले कुजलेले शेणखत यामध्ये मिसळावे आणि ३ दिवसांनी मर प्रादुर्भावित भागात वापरावे. यामुळे बुरशीजन्य संसर्ग नियंत्रणात ठेवता येतो. फवारणी : रोगाचा प्रादुर्भाव जास्त असल्यास पुढील प्रकारे फवारणी करावी - रोको २० ग्रॅम किंवा कॅब्रिओटॉप ४५ ग्रॅम + सुपर स्टिकर २ मिली प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ही फवारणी केल्यास कांदा मर रोग आणि आर्द्र मर यावर नियंत्रण मिळवता येते. कांदा मर रोग हा शेतकऱ्यांसाठी गंभीर समस्या असली तरी योग्य व्यवस्थापन पद्धतींचा वापर करून त्यावर नियंत्रण मिळवता येते. एकात्मिक व्यवस्थापनात मातीची निगा, बीजप्रक्रिया, जैविक आणि रासायनिक उपायांचा समावेश असावा. हे सर्व उपाय केल्यास पिकाचे उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान टाळता येईल.

# 'अविशान' मेंढीची जात शेतकऱ्यांना ठरतेय फायद्याची

मांस तसेच लोकर व्यवसाय करण्यासाठी देशात बहुतेकजण आता मेंढ्यापालन व्यवसायाकडे वळलेले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय लोकप्रिय होत आहे, कारण त्यात कमी खर्चात जास्त नफा मिळतो. तसेच मांसाबरोबरच लोकरीलाही बाजारात मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध राज्यांतील सरकारे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. मात्र असे असतानाही केवळ सुधारित जातींची माहिती नसल्यामुळे बहुतेक मेंढीपालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

'अविशान' मेंढीची जात देते भरपूर उत्पन्न : 'अविशान' ही मेंढ्यांची प्रगत जात असून त्याचे वजन खूप वेगाने वाढते. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी ३ ते ४ कोकरांना जन्म देते. त्याचबरोबर 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून दोनदा गर्भधारणा करतात. म्हणजेच ती एका वर्षात ६ ते ८ मुलांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी 'अविशान' जातीच्या मेंढ्या पाळल्यास त्यांना मोठा नफा मिळेल. ते मांस तसेच लोकर मोठ्या प्रमाणावर विकू शकतात. अविशान मेंढ्यांचा इतिहास : अविशान मेंढ्यांचा



क्लोन तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना खूप मेहनत घ्यावी लागली. १९९७ मध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबन येथून गारोल जातीच्या मेंढ्या आणण्यात आल्या. यानंतर मालपुरा येथील मेंढ्यांसह या जातीचा क्रॉसिंग करून क्लोन तयार करण्यात आला. परंतु शास्त्रज्ञांना पूर्ण यश मिळाले नाही. कारण या मेंढ्यांच्या जातीचा मृत्यूदर जास्त होता. शिवाय दूध देण्याची क्षमताही कमी होती. यानंतर गुजरातच्या पाटणवाडी जातीच्या मेंढ्या मालपुरा येथील मेंढ्यांसह क्रॉस करण्यात आल्या. मग मेंढीची प्रगत जात ''अविशान'' जन्माला आली. हे सामान्य जातीच्या मेंढ्यांपेक्षा जास्त दूध देते. शिवाय, त्याची प्रजनन क्षमता देखील जास्त आहे. वर्षातून दोनदा गर्भधारणा होते.

केवळ ५ टक्के मृत्युदर : अविशान कोकरू इतर जातीच्या मेंढ्यांपेक्षा ३० टक्के वेगाने वाढतात. कोकरे जन्मानंतर लगेचच विक्रीसाठी तयार होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्च येतो. सध्या उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थानसह अनेक राज्यांतील शेतकरी अविशान मेंढ्या मोठ्या प्रमाणावर पाळत आहेत. या मेंढ्यांच्या मृत्यूचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. मांसासाठी ३ महिन्यांचे कोकरू विकता शकता. एक कोकरू साधारणपणे २५०० रुपयांना विकले जाते. जर तुम्ही ५० मेंढ्यांसह अविशान शेती सुरू केली असेल तर तुम्ही एका वर्षात किमान २०० कोकरू विकू शकता.

# आता यंत्रमानवामार्फत करता येणार तण नियंत्रण

पीक व्यवस्थापनामध्ये तणांचे नियंत्रण हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. स्थानिक भाषेमध्ये भांगलण किंवा निंदणीचे हे काम प्रामुख्याने मनुष्यबळाने, तेही महिला मजुरांच्या साह्याने करण्याचा प्रघात होता. मात्र कामांच्या काळात मजुरांची उपलब्धता ही मोठी समस्या बनत आहे. अशा स्थितीमध्ये कोळपे, पॉवर विडर याचा वापर शेतकरी करत आहेत. तण काढणासाठी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त यंत्रमानवाच्या निर्मितीबाबत जगभरामध्ये संशोधन सुरू आहे. ही तण नियंत्रक यंत्रे कार्यक्षमता, अचूकता आणि पर्यावरणीय समतोल प्रदान करतात. नावीन्यपूर्ण यंत्रमानवांची माहिती घेताना त्यांच्या विविध श्रेणी, फायदे, मर्यादा याबाबत माहिती असणे आवश्यक आहे.

तण काढणारा यंत्रमानव : तण काढणारे यंत्रमानव हे स्वायत्त यंत्र आहे. ते लागवडीच्या पिकांपासून तणाची ओळख पटवणे, ते काढून टाकणे ही कामे करते. हा यंत्रमानव कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि कृषी तंत्रज्ञानाचा आकर्षक मिलाफ आहेत. यात विविध तंत्रज्ञान आणि यंत्रणांचा वापर केलेला असते. उदा. पिकांमधून तण ओळखण्यासाठी यांत्रिक दृष्टी प्रणाली (मशिन व्हिजन सिस्टिम) वापरतात. त्यासाठी विविध कॅमेरे आणि सेन्सर शेतातून दृश्य माहिती गोळा करतात. त्याचे विश्लेषण करताना वनस्पतीच्या प्रकार, आकार, रंगरूप, मोजमाप यांचा आधार घेतला जातो. त्या आधारे तण ओळखल्यानंतर आसपासच्या पिकांना हानी पोहोचू न देता तण काढून टाकण्यासाठी पुढील साधनाला सूचना किंवा संदेश देतात. या यांत्रिक साधनामध्ये विविध अवजारांनी उपटून काढणे किंवा तणनाशक फवारणीद्वारे तण मारणे या बाबींचा समावेश असू शकतो. या स्वयंचलित यंत्रमानवामुळे माणसांवरील अवलंबित्व व श्रम कमी होतात.

दृष्टी-आधारित यांत्रिक पद्धतीने तण काढणारे यंत्रमानव : हे यंत्रमानव प्रगत कॅमेरे आणि सेन्सर



सिस्टिम यांच्या साह्याने तयार केलेली यांत्रिक दृष्टी (मशिन व्हिजन) वापरतात. त्याद्वारे पिके आणि तण यांच्यात फरक ओळखल्यानंतर तण भौतिकरित्या काढून टाकण्यासाठी यांत्रिक घटक (उदा.ब्लेड किंवा दाते) वापरले जाते. यात रसायनांचा वापर होत नसल्यामुळे सेंद्रिय किंवा पर्यावरण अनुकूल शेतीसाठी उपयुक्त मानले जातात.

तणनाशक फवारणी करणारे यंत्रमानव : या प्रकारच्या यंत्रामध्ये तण ओळखण्यासाठी वरीलप्रमाणेच व्हिजन सिस्टिम वापरली जाते. मात्र त्यात तण काढून टाकण्याऐवजी त्या तणावर तणनाशकाची शिफारशीत मात्रा अचूक फवारतात. सध्या संपूर्ण शेतामध्ये तणनाशकाची फवारणी करण्यापेक्षा यात रसायनाचा वापर अत्यंत कमी व जिथे आवश्यक तिथेच केला जातो. त्यामुळे रसायनांचे प्रमाण कमी वापरले जाते. अविवेकी फवारणी पद्धतींपेक्षा पर्यावरणीयदृष्ट्या अधिक शाश्वत मानली जाते.

थर्मल तणनाशक यंत्रमानव : मशिन व्हिजनद्वारे तणांची ओळख पटविल्यानंतर त्यांना मारण्यासाठी उष्णतेचा वापर केला जातो. त्या तणांवर अचूक लेसर किरणांचा मारा किंवा प्रोपेन वायूच्या ज्वाला किंवा पाण्याची अतिउष्ण वाफ यांचा मारा केला जातो.

मल्टिस्पेक्ट्रल इमेजिंग यंत्रमानव : बहुतेक यंत्रमानव हे पारंपरिक कॅमेऱ्यांवर अवलंबून असताना काही यंत्रमानवामध्ये मल्टिस्पेक्ट्रल इमेजिंग तंत्रांचा वापर केला जातो. ही प्रणाली दृश्यमान आणि अदृश्य प्रकाशातून माहिती गोळा करते. त्यामुळे प्रत्येक तणांची किंवा वनस्पतींची ओळख अद्वितीय वर्णक्रमीय स्वाक्षरीनुसार (स्पेक्ट्रल सिग्नेचर) पटवली जाते. त्यामुळे त्याचा तणे शोधण्याची अचूकता वाढते. हे तंत्रज्ञान विशेषतः दाट लागवडीच्या पिकामधून तणांची ओळख पटविण्यासाठी अत्यंत उपयोगी ठरते. पुढील तण नष्ट करण्याची प्रक्रिया ही यांत्रिक किंवा रासायनिक असू शकते.

तण काढणाऱ्या यंत्रमानवाचे फायदे : यांत्रिक शिक्षण (मशिन लर्निंग) आणि प्रगत यांत्रिकदृष्टीद्वारे (व्हिजन सिस्टिम)तण शोधण्यात आणि काढून टाकण्यात विशेष अचूकता मिळू शकते. पिकांचे नुकसान होण्याचा धोका कमी होतो. मल्टिस्पेक्ट्रल इमेजिंग वापरणारे काही यंत्रमानव तणवाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यात ओळखून नष्ट करू शकतात. बहुतांश यंत्रमानव यांत्रिकरीत्या तण काढतात किंवा लक्ष्य केंद्रित तणनाशक वापरल्यामुळे रसायनाच्या वापरात लक्षणीय घट होते. यंत्रमानवामुळे तणनाशकांचा वापर शून्य किंवा कमी होतो. परिणामी, मातीचा ऱ्हास आणि भूजल दूषित होण्यापासून वाचू शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सरसकट तणनाशकाच्या वापरामुळे होणारा वनस्पती व सजीवांच्या जैवविविधतेचा ऱ्हास रोखला जातो.

यंत्रमानवाच्या मर्यादा : तण काढणाऱ्या यंत्रमानवाच्या संशोधन आणि विकासावर लक्ष दिले जात असले तरी अद्याप त्यांच्या कामकाजाविषयी किंवा कामांच्या एकूणच अंमलबजावणीसंबंधी अनेक मर्यादा आणि आव्हाने आहेत. या मर्यादा तांत्रिक, आर्थिक किंवा विद्यमान शेती प्रणालींमध्ये जुळवणूकीशी संबंधित असू शकतात. यंत्रमानव आणि संबंधित तंत्रज्ञान हे आर्थिकदृष्ट्या अद्याप सामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर आहे. या प्रकारच्या यंत्रमानवाची किंमत ५ लाख ते २५ लाखांदरम्यान आहेत.

ही मोठ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण गुंतवणूक ठरत असली, तरी लहान आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी आर्थिक भार ठरू शकते. एकाचवेळी करावी लागणारी ही गुंतवणूक त्यांना शक्य नाही किंवा त्यासाठी कर्जाच्या सापळ्यामध्ये अडकण्याची भीती आहे. कारण यंत्रमानव घेऊन त्याच्या स्वतःच्या शेतात वापर किंवा भाडेतत्त्वावर देऊनही किमत वसूल होण्यासाठी दीर्घकाळ लागू शकतो. हे यंत्रमानव वापरण्यासाठी तंत्रज्ञानाची विशिष्ट समज असावी लागेल. कारण त्यात जोडणी (सेटअप), मूळ काम (ऑपरेशन) आणि देखभाल प्रक्रियांचा समावेश आहे. अल्पशिक्षित व तंत्रज्ञानाची माहिती नसलेल्या शेतकऱ्यांसाठी हे थोडेसे कठीण ठरू शकते. मात्र ग्रामीण पातळीवर काम करू इच्छिणाऱ्या प्रशिक्षित तरुणांसाठी सुवर्णसंधी ठरू शकते. कृषी अभियांत्रिकी आणि मेकाट्रोनिक्स सारखे उच्चशिक्षण घेऊन तरुण या व्यवसायामध्ये जम बसवू शकतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१०५४ : वृषभ राशीत 'क्रॅब नेब्यूला' दिसत असल्याचे चिनी लोकांना समजले. नंतर जॉन बेव्हिसने इ. स. १७३१ मधे त्याचे निरीक्षण केल्याची नोंद आहे.
१७७६ : अमेरिकेने स्वत:ला इंग्लंडपासून स्वतंत्र घोषित केले.
१७८९ : इस्ट इंडिया कंपनीने मराठा शासक पेशवा आणि निजाम शासक यांच्याबरोबर टिपू सुलतान यांच्या विरुद्ध खिलाफत ची संधी केली.
१८२६ : अमेरिकेच्या स्वातंत्र्य दिनाच्या सुवर्णमहोत्सवाच्या दिवशी अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष थॉमस जेफरसन आणि दुसरे राष्ट्राध्यक्ष जॉन ॲडॅम्स यांचे निधन झाले.
१८८६ : फ्रांसने अमेरिकेला स्टॅच्यू ऑफ लिबर्टी हे भेट दिले.
१९०३ : मोटर रेस स्पर्धे मध्ये भाग घेणारी डॉरोथी लेव्हिट ही पहिली इंग्लिश महिला ठरली.
१९११ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या एकांतवासास प्रारंभ
१९३६ : 'अमरज्योती' हा 'प्रभात'चा चित्रपट मुंबईच्या 'कृष्ण' सिनेमात प्रदर्शित झाला.
१९४६ : सुमारे ३८१ वर्षे परकीय सत्तांनी राज्य केल्यानंतर फिलीपाइन्सला (अमेरिकेपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९४७ : ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या भारताचे 'भारत' व 'पाकिस्तान' असे दोन स्वतंत्र देश निर्माण करावेत असा ठराव ब्रिटनच्या संसदेत मांडण्यात आला.
१९९५ : टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोपचे संचालक डॉ. गोविंद स्वरूप यांना एम. पी. बिर्ला पुरस्कार प्रदान
१९९७ : 'नासा'चे पाथफाइंडर हे मानवविरहित यान मंगळावर उतरले.
१९९९ : लष्कराच्या १८ व्या बटालियनने कारगिलमधील द्रास या उपविभागातील 'टायगर हिल्स' हा लष्करीदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा टापू घुसखोरांच्या ताब्यातून मुक्त केला. याबद्दल लष्करप्रमुख वेदप्रकाश मलिक यांनी १८ व्या युनिटला 'युनिट सायटेशन' हा विशेष सन्मान जाहीर केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९० : भारताचे सर्वेक्षण करणारे कर्नल सर जॉर्ज एव्हरेस्ट (मृत्यू: १ डिसेंबर १८६६)
१८०७ : जुसेप्पे गॅरीबाल्डी इटालियन सेनापती व राजकीय नेता (मृत्यू: २ जून १८८२)
१८९७ : भारतीय कार्यकर्ते अलारी सीताराम राजू यांचा जन्म. (मृत्यू: ७ मे १९२४)
१८९८ : गुलजारीलाल नंदा - भारताचे दुसरे पंतप्रधान, स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी कार्यकर्ते (मृत्यू: १५ जानेवारी १९९८)
१८७२ : काल्व्हिन कूलिज - अमेरिकेचे ३० वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ५ जानेवारी १९३३)
१८८२ : एकेडेमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सचे स्थापक लुईस बी. मेयर यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑक्टोबर १९५७)
१९१२ : पं. निवृत्तीबुवा सरनाईक - जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक (मृत्यू: १६ फेब्रुवारी १९९४)
१९१४ : निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ 'पी. सावळाराम' - भावगीतलेखक. कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली. (मृत्यू: २१ डिसेंबर १९९७)
१९१६ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री नसीम बानो यांचा जन्मदिन.
१९२६ : विनायक आदिनाथ तथा 'वि. आ.' बुवा - विनोदी साहित्यिक (मृत्यू: १७ एप्रिल २०११)
१९८३ : भारतीय-इंग्लिश पत्रकार अमोल राजन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२९ : कान्होजी आंग्रे - सेना सरखेल (जन्म: ऑगस्ट १६६९)
१८२६ : जॉन ॲडॅम्स - अमेरिकेचे २ रे राष्ट्राध्यक्ष आणि पहिले उपराष्ट्राध्यक्ष (जन्म: ३० आक्टोबर १७३५)
१८२६ : थॉमस जेफरसन - अमेरिकेचे ३ रे राष्ट्राध्यक्ष, २ रे उपाध्यक्ष आणि १ ले परराष्ट्रमंत्री. त्यांनी मांडलेल्या विचारांवर अमेरिकेची राज्यघटना आधारित असून तेथील लोकशाहीला 'जेफरसनची लोकशाही' असे म्हणतात. (जन्म: १३ एप्रिल १७४३)
१८३१ : जेम्स मोन्रो - अमेरिकेचे ५ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २८ एप्रिल १७५८)
१९०२ : स्वामी विवेकानंद - भारतीय तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार करणारे तत्त्वज्ञ, रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य, गुरुंची स्मृती चिरंतन राहावी यासाठी त्यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. (जन्म: १२ जानेवारी १८६३)
१९३४ : मेरी क्यूरी - नोबेल पारितोषिक विजेत्या पोलिश-फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ७ नोव्हेंबर १८६७)
१९६३ : पिंगाली वेंकय्या - भारतीय तिरंग्याचा रचनाकार (जन्म: २ ऑगस्ट १८७६)
१९८० : रघुनाथ वामन दिघे - रसाळ लेखन करणारे कादंबरीकार. 'पाणकळा', 'सराई', 'पड रे पाण्या', 'आई आहे शेतात', 'गानलुब्धा', 'मृगनयना' वगैरे त्यांच्या कादंबर्या अतिशय गाजल्या. (जन्म: २४ एप्रिल १८९६)
१९८२ : भरत व्यास - भक्तिप्रधान, पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक चित्रपटांचे गीतकार (जन्म: १९१८)
१९९९ : वसंत शिंदे - विनोदसम्राट, कलागौरव पुरस्कार, चित्रभूषण पुरस्कार व बालगंधर्व पुरस्काराने सन्मानित (जन्म: १४ मे १९०९).

## थोडक्यात



### खा.कल्याण काळे यांनी केले नाथांच्या पालखी रथाचे सारथ्य

जालना: जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार (२ जुलै) शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांच्या पालखी रथाचे दर्शन घेतले आणि नाथांच्या पालखी रथाचे सारथ्य केले. यावेळी त्यांनी नाथांच्या चरणी लीन होत भरपूर पाऊस पडू दे, बळीराजासह सगळी जनता सुखी राहुदे, असे साकडे घातले. व जालना लोकसभा मतदार संघातील वारीतील अनेक दिंड्यांना भेटी दिल्या. याप्रसंगी रविंद्र काळे, संदीप बोरसे, भाऊसाहेब जगताप, सदाशिव विटेकर, दिंडी चालक नाथ वंशज रघुनाथ बुवा गोसावी, योगेश बुवा गोसावी, पप्पुराज ठुबे, शिवाजी ढाकणे, भाऊसाहेब गवळी, सावता गाडेकर, कैलास वाघ, विठ्ठल कोरडे, संतोष मेटे, बाबुराव डकले, पंढरीनाथ जाधव, मुकेश चव्हाण, ज्ञानेश्वर जाधव ,जयप्रकाश दादा चव्हाण, राम सिरसाठ, बाळासाहेब वाकुळणीकर, अरूण पैठणे, विजय गव्हाणे, गणेश कोळकरआदींची उपस्थिती होती.

### केएसके अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात कृषि दिन साजरा

बीड : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत असलेल्या सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ



काकू अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात १ जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी केली. संस्थेचे सहसचिव डॉ. जि. व्ही. साळुंके यांच्या मार्गदर्शना खाली दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाविद्यालय प्रांगणात रस्त्याच्या कडेने शेकडो वृक्ष लागवड करण्यात आली. यामध्ये दोन्ही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे झाडे लावली तसेच कॉलेज मध्ये शिक्षण पूर्ण होईपर्यंत जतन आणि संगोपन करण्याची शपथ घेतली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### माजी विद्यार्थ्यांकडून मुख्याध्यापकांचा सत्कार

बीड : येथील नॅशनल उर्दू हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, जुना बाजार बीड येथे तेथील माजी विद्यार्थी यांनी आज २ जुलै २०२५ रोजी मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्वीकारल्याने नवीन



मुख्याध्यापकांचा सत्कार करत शाळेबद्दल आपली जबाबदारी आणि कृतज्ञता व्यक्त केली.सुरुवातीला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सिद्दीकी नदीम सर यांचा शाळेतील माजी विद्यार्थी यांनी शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व यावेळी शेख मोहम्मद सलीम यांनी मनोगत व्यक्त केले की गुरुजींच्या मार्गदर्शनामुळे आम्ही जीवनातील प्रत्येक अडचणींचे वळण सहज पार करु शकलो त्यामुळे आज आम्हाला आमच्या शाळेत येवून भेट देतांना आनंद होत आहे. मुख्याध्यापक नदीम सर म्हणाले की, आज कित्येक दिवसांनी शिक्षणप्रेमी माजी विद्यार्थी हे अतिथी रुपाने शाळेत आले त्यांची प्रगती पाहून आम्हाला आमच्या कामाची पोहोचपावती मिळाल्याचे समाधान आहे. यावेळी शेख अखील सर, शेख अब्दुल रहीमस, शेख जमीर सर, नईम देशमुख सर, सय्यद सर्फराज सर, देशमुख आसेफ सर, शेख शब्बीर सर, आदींची उपस्थिती होती.

### ०७ जुलै रोजी जिल्हास्तरीय लोकशाहीदिन

बीड : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ७ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

# जिल्हा उपनिबंधक यांचे बँकेवर नियंत्रण नसल्याने शेतकऱ्याचा अपमान?

## कृषी दिना दिवशी शेतकऱ्यांचा अपमान!

जालना। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळणी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत कृषी दिनाच्या दिवशीच शेतकऱ्याला बँक अधिकाऱ्याने झिडकारल्याची धक्कादायक घटना घडली. याला जबाबदार जिल्हा उपनिबंधक असल्याचे बोलल्या जात आहे. यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक यांची बँकेचे अधिकाऱ्यावर वचक नसल्याचे यावरून दिसून येत आहे असे बोलले जात आहे.''कर्ज मागायला लाज कशी वाटत नाही?'' अशा अपमानजनक शब्दांत शेतकऱ्याला हिणवण्यात आले. या प्रकारामुळे संपूर्ण तालुक्यात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. आता याप्रकरणी जिल्हाधिकारी का कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ही घटना १ जुलै रोजी घडली असून, उस्वद येथील प्रगतशील शेतकरी वसंत नायब राव सरोदे यांनी याबाबतची तक्रार थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल



केली आहे. काही दिवसांपूर्वीच सरोदे यांनी आपली थकबाकी ८२,६११ रुपये पूर्णपणे भरून काढली होती. त्यानंतर त्यांनी नव्या हंगामी कर्जासाठी अर्ज केला. मात्र, शाखाधिकारी बी. जे. केडिया यांनी सार्वजनिकरित्या अपमान करत, ''वारंवार कर्ज मागायला कशाला येता? लाज वाटत नाही का?'' असे वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

कृषी दिनासारख्या शेतकऱ्यांच्या सन्मानाच्या दिवशीच असा अपमान झाल्याने ग्रामस्थांत आणि शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आहे. तक्रारीत वसंत सरोदे यांनी १० जुलै रोजी आत्मदहनाचा इशारा दिला असून, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात शाखाधिकारी केडिया यांनी संपर्क केला असता, ''मी शेतकऱ्याला असं काहीही बोललो नाही. माझ्यावर केलेले आरोप चुकीचे आहेत. मात्र कुणाचा गैरसमज झाला असेल, तर मी सर्वांसमोर माफी मागतो,'' असे स्पष्ट केले. दरम्यान, शाखाधिकारी केडिया यांच्याविरोधात यापूर्वीही खाते होल्ड करणे, कर्ज नाकारणे आणि ग्राहकांना अपमानित करणे यासारख्या तक्रारी झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाचा तीव्र निषेध करत उबाठाचे तालुका संघटक ज्ञानेश्वर (माऊली) सरकटे यांनी २ जुलै रोजी संबंधित शेतकऱ्यांसह शिवसैनिकांना घेऊन शाखाधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी तक्रारदार वसंत सरोदे, संतोष सरोदे (उस्वद), गंगाधर खंदारे, शरद खंदारे (कानडी), शिवाजी येऊल, बाबूराव गुंड, विठ्ठल लाड आदींची उपस्थिती होती. ३६३३ पैकी ९९७ शेतकऱ्यांचे खाते नव्याने चालू महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या तळणी शाखेत एकूण ३ हजार ३६३ पिककर्ज खातेदार असून, त्यापैकी ९९७ कर्जदारांचे खाते नवे जुने करून चालू करण्यात आले. मात्र अद्यापही २,३६६ शेतकरी थकबाकीदार असल्याचे शाखाधिकारी केडिया यांनी सांगितले. संबंधित अधिकाऱ्यावर तातडीने शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावीबँकिंग व्यवस्थेत सुधारणा करून शेतकऱ्यांचा सन्मान राखावा जिल्हा प्रशासनाने लक्ष घालून शेतकऱ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करावा व तसेच जिल्हा उपनिबंधक यांना पण खुलासा करणे गरजेचे आहे असे बोलले जात आहे. जिल्हाधिकारी यांनी तात्काळ या संदर्भात जिल्हा उपनिबंधक यांच्याकडून अहवाल मागणी गरजेचं आहे.

## भटक्या-विमुक्त आदिवासी समाजाच्या न्यायिक मागण्यांसाठी आवश्यक पाठपुरावा करणार-फड

मुंबई। प्रतिनिधी

मुंबई येथे महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाच्या दरम्यान महाराष्ट्रातील भटक्या आणि विमुक्त समाजाच्या न्याय हक्काच्या अनेक मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड यांनी भेट देऊन त्यांच्या मागण्या समजून घेतल्या. भटक्या आणि विमुक्त समाजाच्या ज्या न्याय हक्काच्या मागण्या आहेत त्या पूर्ण होईपर्यंत आपण त्यांच्या पाठीशी आहोत, तसेच त्यासाठी जो पाठपुरावा करता येईल तो येणाऱ्या काळात आपण नक्कीच करू असे आश्वासन राजेभाऊ फड यांनी दिले.



महाराष्ट्र विधिमंडळाचे सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे. याच दरम्यान भटक्या विमुक्त आदिवासी समाजाच्या अनेक मागण्यांच्या संदर्भाने आंदोलन सुरू आहे. यानुषंगाने त्यांनी पाच मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने भटक्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय व मंत्री, नागरिकत्वाचे पुरावे, जमिनीचे नियमन, समाजावरील अन्याय अत्याचार रोखण्यासाठी संरक्षक कवच तसेच ३१ ऑगस्ट हा विमुक्त दीन साजरा करावा अशा मागण्या भटके विमुक्त संयोजन समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आल्या आहेत. शासनाने या मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी मुंबई येथे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड यांनी भेट दिली. आंदोलकांच्या मागण्या समजून घेऊन त्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी आवश्यक असेल तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन राजेभाऊ फड यांनी दिले.

## बेग अमीर बी यांनी मिळवली पीएच.डी

माळापुरी। प्रतिनिधी



येथील सेवानिवृत्त इमाम मिर्झा अब्दुल अझीज बेग यांची मुलगी बेग अमीर बी यांनी ''माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये मानवी हक्कांच्या मूल्यांच्या विकासाचा अभ्यास'' या विषयावर पी.एच.डी डॉक्टरेट मिळवली आहे. माळापुरी गावातून पी.एच.डी डॉक्टरेट मिळवणाऱ्या त्या पहिली महिला असल्याने गावासाठी प्रेरणा स्थान ठरल्या आहे.

माळापुरी येथील मूळचे रहिवासी आणि कतर देशातील मस्जिदचे सेवानिवृत्त इमाम आणि इस्लामिक विद्वान मिर्झा अब्दुल अझीज बेग यांची मुलगी बेग अमीर बी यांना शिक्षण विद्या शाखेतून माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये मानवी हक्कांच्या मूल्यांच्या विकासाचा अभ्यास'' या विषयावर दि.२७ जून २०२५ रोजी पी.एच.डी डॉक्टरेट प्रदान करण्यात आली आहे.त्यांच्या या कार्यात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील डी.एस.आर. कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.एजाज अली यांचे अमूल्य असे मार्गदर्शन राहिले आहे.बेग अमीर बी यांनी मिळविलेली पी.एच.डी डॉक्टरेट माळापुरी गावासाठी ऐतिहासिक यश ठरले असून बेग अमीर बी ह्या माळापुरी गावातून पी.एच.डी डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिली महिला असल्याने त्या गावासाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत.यावेळी बेग अमीर बी यांचे वडील मिर्झा अब्दुल अझीज बेग यांनी आपल्या मुलीच्या यशाबद्दल अपार आनंद व्यक्त केला असून सर्व नातेवाईक आणि गावकऱ्यांनी बेग अमीर बी यांना शुभेच्छा दिल्या.

## गेवराई बाजार समितीला 'शेतकरी भवन बांधकामास मंजुरी-आ. विजयसिंह पंडित

गेवराई। प्रतिनिधी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजने अंतर्गत गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या रु.१८६.३१ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. गेवराई शहरात येणाऱ्या शेतकरी बांधवांना या माध्यमातून मुक्कामाची सोय भविष्यात होणार आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीला शेतकरी भवन मंजुर व्हावे यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप यांच्यासह संचालक मंडळाने दोहोंचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहे.

मराठवाड्यातील अग्रगण्य बाजार समिती म्हणून गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीची ओळख आहे. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीने आजवर विविध उपक्रम यशस्वीरित्या राबविले आहेत. ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना मुलभूत सुविधांसह गेवराई शहरात मुक्कामाची सोय व्हावी यासाठी शेतकरी भवन बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होता. शासनाच्या पणन विभागाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजने अंतर्गत गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या रु.१८६.३१ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.१ जुलै रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता दिली आहे. याकामी आ. विजयसिंह पंडित यांनी मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा केला होता. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीला नवीन शेतकरी भवन बांधकामास मंजुरी मिळाल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार, पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांचे आभार व्यक्त केले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवांना मुक्कामाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप यांच्यासह संचालक मंडळाने माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहे. गेवराई शहरालगत बाजार समितीच्या व्यापारी संकुला लगत लवकरच शेतकरी भवनाची देखणी वास्तू उभारली जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या मुक्कामासह आवश्यक मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. शेतकरी भवनाला मंजुरी मिळाल्याबद्दल गेवराई तालुक्यातील शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे.

## चार दिवस रंगणार आषाढी महोत्सव संगीतमय कथा व सांप्रदायिक कीर्तने

बीड। प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते. पंढरपूरची वारी गाठता न आलेल्या भाविकांसाठी बीडमध्येही अध्यात्मिक वातावरणाची अनुभूती यावी, या हेतूने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने नवनाथ कथा व सांप्रदायिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन दिनांक ४ जुलै ते ७ जुलै २०२५ दरम्यान करण्यात आले आहे.



हे चार दिवसीय भक्तिमय आयोजन बीड येथील खटोड प्लाझा, वृंदावन गार्डनजवळ, एमआयडीसी रोड येथे पार पडणार आहे. या सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत कथाकार व कीर्तनकार सहभागी होणार असून, विशेष आकर्षण ठरणार आहे साध्वी सोनाली दिदी करपे (चकलांबा) यांचे नवनाथ कथेचे संगीतमय, रसाळ आणि सखोल निरूपण. तसेच इतर अनुभवी कीर्तनकार आपल्या कीर्तनसेवेने भाविकांना मंत्रमुग्ध करतील.

## महाराष्ट्र व्यापारी कल्याण बोर्ड स्थापन करण्याची मागणी- पंच

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र हे राज्य व्यापारी व उद्योग क्षेत्रात संपूर्ण भारतात अग्रगण्य असून संपूर्ण भारतात महाराष्ट्र राज्य हे केंद्र शासनाला जीएसटी व इतर कर माध्यमातून भरघोस उत्पन्न देणारे राज्य आहे. अशा या व्यापार-उद्योगासाठी योगदान देणाऱ्या व्यापाऱ्यांच्या कल्याणासाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र व्यापारी कल्याण बोर्ड' स्थापन करण्यात यावे, अशी मागणी व्यापारी महासंघ जिल्हा जालनातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी स्वरूपात करण्यात आली आहे.

कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच, मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब, कार्याध्यक्ष दिपक भुरेवाल, सचिव संदीप काबरा यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेऊन त्यांच्यामार्फत



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ''व्यापारी वर्ग हा देशाच्या आर्थिक महासत्तेचा स्तंभ'' असल्याचे प्रतिपादन लक्षात घेता, व्यापाऱ्यांच्या कल्याणासाठी स्वतंत्र मंडळ स्थापनेची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, भारतीय व्यापारीमध्यम भारत संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष भरतिया व सरचिटणीस प्रविण खंडेलवाल यांनी देशभरातील राज्यांत व्यापारी कल्याण मंडळ स्थापन करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. छत्तीसगड, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, अरुणाचल प्रदेश आदी राज्यांनी हे मंडळ स्थापून व्यापाऱ्यांना सामाजिक सुरक्षा, आरोग्य, विमा, वित्तीय मदत, आणि कल्याणकारी योजना लागू केल्या आहेत. महाराष्ट्र राज्यानेही इझी ऑफ डोईंग बिजनेसच्या अनुषंगाने व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण करावे, तसेच व्यापाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी भूमिका महासंघाने मांडली आहे. या निमित्ताने व्यापारी हितासाठी पुढाकार घेणाऱ्या संघटनांनी एकत्र येऊन लवकरात लवकर 'महाराष्ट्र व्यापारी कल्याण बोर्ड' स्थापन करावा, अशी व्यापक मागणी होत आहे, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग घेण्याचे कृषी विभागाचे आवाहन

### शेतक-यांना ३१ जुलैपर्यंत योजनेत सहभागी होता येणार

बीड। प्रतिनिधी

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम विमा योजनेत भाग घेता येणारी पिके खरीप ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतक-यांना ३१ जुलैपर्यंत सहभागी होता येईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस.एम.साळवे यांनी कळवले आहे. पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाईबाबतच्या माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७ वर संपर्क साधावा. बीड जिल्ह्यासाठी आयसीआयसीआय लोंबार्ड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, स्थानिक सहायक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

ज्वारी पिकासाठी ३३ हजार रूपये प्रति हेक्टरी विमा संरक्षित रकमेस रूपये ६६० विमा हप्ता शेतकऱ्याने भरावयाचा आहे. याप्रमाणेच बाजरी पिकास प्रति हेक्टरी ३० हजार रूपयांच्या विमा संरक्षित रकमेस रूपये ६०० हप्ता, प्रत्येकी प्रति हेक्टरी भूईमुगास ४५ हजार रूपये विमा संरक्षित रकमेस ९०० रूपये, सोयाबीन ५८ हजार विमा संरक्षित रकमेस एक हजार १६० रूपये, मूग २५ हजार विमा संरक्षित रकमेस ५००, उडीद २५ हजार विमा संरक्षित रकमेस ५००, तूर ४५ हजार विमा संरक्षित रकमेस ९००, कापूस ६० हजार विमा संरक्षित रकमेस एक हजार ८००, मका ३६ हजार विमा संरक्षित रकमेस ७२० आणि कांदा ६८ हजार विमा संरक्षित रकमेस तीन हजार ४०० रूपये शेतकऱ्याने विमा हप्ता रक्कम भरावयाची आहे. या योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा अग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई पीक पाहणी बंधनकारक आहे. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात.

कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे. ई-पीक पाहणी आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल, भरलेला विमा हप्ता जप्त केला जाईल. विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास ४० रूपये मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनीमार्फत सीएससी विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्त्या व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालक यांना देऊ नये. एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही. मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टल वरून जमा करण्यात येणार आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० % आहे.

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना देखील या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र, त्या साठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या किमान सात दिवस अगोदर संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे. बिगर कर्जदार शेतक-याने आपला ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक (फार्मर आयडी), ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड व पीक पेरणीचे स्वयं-घोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देऊन व हप्ता भरुन सहभाग घ्यावा.

याशिवाय कॉमन सर्विस सेंटर (), आपले सरकारच्या मदतीने विमा योजनेत सहभाग घेता येईल किंवा पोर्टलचे सहाय्य देखील घेता येईल, योजनेत सहभाग घेतलेल्या शेतकऱ्याने नंतर ई-पीक पाहणी नोंद पूर्ण करून घेणे बंधनकारक आहे, असेही श्री. साळवे यांनी कळवले आहे.

# जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल जास्त

## बीडमध्ये अनाधिकृत शाळांवर कारवाई होणार का? –मनोज जाधव

### शाळा तपासून अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विभागाने मागवली

बीड । प्रतिनिधी

राज्यातील अनाधिकृत शाळांबाबतची माहिती सादर करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने आदेश निर्गमित केले असून आता जिल्ह्यात अनाधिकृत शाळा आढळुन आल्यास सदरिल शाळेवर शासन निर्णय दि.१८ डिसेंबर २०२३ नुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे. अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचेकडुन त्यांचे बीट/केंद्र मधील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे जियो टॅग फोटो काढणे आणि विहित प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ ०७ जुलै पर्यंत सदरिल माहिती व अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल आणि इतर शाळा जास्त आहेत. तेव्हा शिक्षण विभागाला



अनाधिकृत शाळा सापडणार का? आणि त्यांच्यावर कारवाई होणार का ? असा सवाल शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केला आहे.

राज्यात मागील काही वर्षांमध्ये राज्य शासनाची कोणतीही मान्यता न घेता अनाधिकृत शाळा मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाट शुल्क वसूल करत असतात. या शाळांवर कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालनालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यात तपासण्या करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यात देखील बऱ्याच अनाधिकृत शाळा असल्याची भीती व्यक्त होत आहे. परंतु जिल्ह्यातील अनाधिकृत शाळांची तपासणी करून त्यावर कारवाई केली जाईल का ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी शाळा तपासणी करण्याचे कागदी घोडे न नाचवता संबंधित शाळांवर कारवाईच करावी. अशीही मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी जॉन्सन बनले निक्षय मित्र !



### जिल्ह्यातील इतरांनीही निक्षय मित्र बनण्याचे आवाहन, प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन निक्षय मित्र बनले. जिल्ह्यातील पाच क्षय रूग्णांना जिल्हाधिकारी यांनी सहा महिन्यांसाठी दत्तक घेत त्यांना आज पोषण कीटचे वाटप केले.

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय टीबी मुक्त भारत अभियान, टीबी फोरम व टीबी कोमोर्बीडीटीच्या जिल्हा समन्वय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात झाली.

जिल्ह्यात एकूण एक हजार २३९ क्षय रुग्ण उपचार घेत आहेत. त्यापैकी ३५० रूग्णांना निक्षय मित्र यांच्यामार्फत निक्षय पोषण आहार किटचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षयरुग्णांना निक्षय पोषण आहार कीट उपलब्ध करून देण्यासाठी विविध घटकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन श्री. जॉन्सन यांनी केले.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेशकुमार माने, वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल चव्हाण, आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अंबाजोगाई तालुक्यात महिन्याला होतो तीन कोटींचा ऑनलाईन विज भरणा

## पंचवीस हजार ग्राहक घेतात ऑनलाइन सेवेचा फायदा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

वीज देयकाचे पैसे भरण्यासाठी रांगेत तासन तास ताटकळत उभे राहावे लागू नये यासाठी विद्यूत ग्राहकांची सोय म्हणून महावितरणने सुरू केलेल्या ऑनलाइन वीज भरणा करण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील २५ हजार वीज ग्राहक याचा उपयोग करत महिन्याला ३ कोटी रुपयांचा वीज बिल भरणा करतात.

वीज ग्राहकांना देयकाची रक्कम भरण्यासाठी वीज बिल भरणा केंद्रावर जाण्याची गरज पडू नये यासाठी महावितरणकडून वीज ग्राहकांसाठी ऑनलाइन पद्धतीने वीज देयक भरण्याची सुविधा सुरू करण्यात आली आहे . कधीही , कुठेही , केव्हाही वीज ग्राहक जगाच्या कानाकोप – यातून वीज देयकाची रक्कम भरण्याची सुविधा महावितरणकडून ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे . महावितरणच्या अंबाजोगाई तालुक्यातील वीज ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात या हायटेक सुविधांचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे. अंबाजोगाई शहरात राहणारे नागरिक सुशिक्षित असल्याने त्यांना रांगेमध्ये उभारण्याचे आवडत नाही. त्यामुळे महावितरणने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाईन वीज बिल सेवेचा वापर करून तालुक्यातील पंचवीस हजार ग्राहक ऑनलाईन विज बिल भरतात. तालुक्यातील २५ हजार ग्राहक ऑनलाईन वीज भरत असल्याने महावितरण ला दर महिन्याला ३ कोटी रुपयांचा विज बिल मिळते. ऑनलाइन ची सुविधा उपलब्ध झाल्याने ग्राहकाबरोबरच महावितरणची ही डोकेदुखी कमी झाली आहे. यामुळे दर महिन्याला ऑनलाइन वीज बिल भरणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. ◀◀ पान २ वर

# अंबाजोगाईच्या ऊसतोड मजुराच्या मुलाचा आंतरराष्ट्रीय एशियन चॅम्पियन शिपमध्ये यशस्वी डंका

## राजकिशोर मोदी यांच्या वतीने आदित्यच्या यशाचा सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील मंगळवार पेठ भागातील रहिवाशी असलेल्या ऊसतोड कामगाराचा मुलगा चि. आदित्य दिलीप जाधव (वय १७) या तरुणाने एशियन चॅम्पियन शिप मध्ये रौप्यपदक पटकावत आपल्या उल्लेखनीय कामगिरीने अंबाजोगाई शहरासह संपूर्ण भारत देशाची मान उंचावली आहे. व्हिएतनाम येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात रौप्यपदक (सिल्वर



मेडल) पटकावून आदित्यने जागतिक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत अपार मेहनत, कठोर सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आदित्य जाधवने हे दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्याची ही झेप केवळ वैयक्तिक नाही, तर लाखो गरीब घरातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.चि आदित्यची प्रेरणा इतर तरुण घेऊन अपार मेहनत तथा कष्टाने त्यांच्यासारखेच यश संपादन करून समाजाचे त्याचबरोबर आपल्या देशाचे नाव उज्वल करतील अशी भावना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आदित्यचा सत्कार व सन्मान करतांना व्यक्त केली. आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थिती ला दोष न देता त्याने केलेल्या कष्टाचे हे फलित असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे ◀◀ पान २ वर

# रविवारी गुणवंत गौरव सोहळ्याचे आयोजन ;पेशवा प्रतिष्ठानचा पुढाकार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

रविवार दि.सहा जुलै रोजी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने समाजातील दहावी बारावी तसेच इतर स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून परशुराम आर्थिक विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आशिष दामले योगेश्वरी देवल कमेटीचे कोषाध्यक्ष शिरीष पांडे,गो. कु.यो. कन्या विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका स्मिता धावडकर,लातूर येथील पोलीस उपअधीक्षक गजानन भातलवंडे पुणे येथील जितेंद्र कुलकर्णी आदी उपस्थित राहणार आहेत यावेळी गुणवंत कौतुक सोहळ्यात गुणवंत विद्यार्थी तसेच भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त घेण्यात आलेल्या शिबिरात रक्तदान केलेल्या व्यक्तींचाही सन्मान तसेच परशुराम विद्यार्थी सहायक मंडळ यांच्या वतीने उच्च शिक्षणासाठी एका होतकरू विद्यार्थ्यास बिनव्याजी शैक्षणिक मदतीचे वाटप तर यावर्षीपासून दरवर्षी कृषी भूषण पुरस्कार देण्यात येणार असून यावर्षीचा पुरस्कार जवळगाव येथील प्रगतिशील शेतकरी विठ्ठल व्यंकटराव देशपांडे यांना जाहीर झाला असून शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल भारतीय शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे हा सोहळा कै गोपीनाथ मुंडे सभागृह खोलेश्वर महाविद्यालय येथे दुपारी पाच वाजता होणार असून समाज बांधव भगिनी युवक यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन पेशवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. महेश अकोलकर डॉ.संकेत तोरंबेकर, केदार दामोशन,श्रीकांत जोशी,अनिता औटी, शुभांगी पत्की,कल्याणी सोनेसांगवीकर,यांनी केले आहे.

# युवा पत्रकार संघाची आ सुरेश आण्णा धस यांच्यासोबत ग्रेट भेट



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघ'' आणि आ सुरेश आण्णा धस यांच्यातील मुंबईत सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे त्यानिमित्त युवा पत्रकारांची ग्रेट भेट झाली आणि खरोखरच महत्त्वाची आणि प्रेरणादायी असावी...भेटीत अनेक विषयांवर चाय पे चर्चा झाली गेली दिलखुलास पणे गप्पा मारल्या. आणि युवा पत्रकार संघाचे कौतुक केले.यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, जेष्ठ पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, जेष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार समीर शेख, अक्षय विधाते, प्रेम पवळ, सोपान पगारे,बाळु राऊत, जुबेर सय्यद दिसत आहेत.

# महिलेला मारहाण करत घराचा कडी, कोंडा तोडून ३० हजार लांबविले !

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील देवळाली येथे बुधवारी दुपारच्या दरम्यान घरासमोरील शेतात काम करत असताना येथील एकाच कुटुंबातील चौघांनी येऊन जुन्या भांडणांची कुरापत काढून लाथाबुक्यांनी मारहाण करत, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत, बंद घराचा कडी, कोंडा तोडून आत घुसून संसारउपयोगी वस्तुची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेले रोख ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना २ जुलै



रोजी दुपारच्या दरम्यान घडली. या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील देवळाली (पानाची) येथील कल्पना मुंकूद वेदपाठक या दुपारच्या दरम्यान स्वताच्या घरासमोरील शेतात काम करत असताना येथील चौघांनी त्याच्या घरी घेऊन जुन्या भांडणाची कुरापत काढून लाथा, बुक्यांनी मारहाण करत मला ◀◀ पान २ वर

# घाटनांदुर येथील एसबीआयचे एटीएम बंद असल्याने पैशाचा खडखडाट

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील व परळी मतदारसंघातील सर्वात मोठी असलेली बाजारपेठ घाटनांदुर असल्यामुळे दररोज ४० ते ५० खेड्यातील नागरिकांची हजारोंच्या संख्येने दररोज ये – जा असते परंतु घाटनांदुर येथील स्टेट इंडिया बँकेचे एटीएम बंद असल्याने येथील व परिसरातील नागरिकांना आर्थिक व्यवहारासाठी एटीएम बंद असल्याने याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे हे फक्त एटीएम नावालाच असल्याचे दिसत आहे त्यामुळे एटीएम समोरील जागा मोटरसायकलच्या





गाड्यांचा अड्डा दिसत आहे घाटनांदुर व परिसरातील ग्राहकांना बँकेने एटीएमची व्यवस्था करून अनेक सोप्या सुविधा ऑनलाइन पद्धतीने देण्यात येतात पण घाटनांदुर येथील शाखेच्या एटीएमची सुविधा फक्त नावालाच दिसताना दिसत आहेत. व तसेच ग्राहक बँकेमध्ये काही कामानिमित्त गेले तर सर्वसामान्य ग्राहकांना कर्मचाऱ्याकडून अरेरावीची भाषा बोलून उत्तरे दिली जातात व येथील बँकेतील कर्मचाऱ्यांच्या फोरव्हीलर बँकेच्या समोर पार्किंग होत असल्यामुळे बँकेत येणाऱ्या ग्राहकांना ये–जा करण्यासाठी मोठी कसरत घ्यावी लागत आहे या सर्व बाबीकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घाटनांदुर येथील शाखेतील कर्मचाऱ्याकडून होत असलेला मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवून दिवसेंदिवस एटीएम बंद राहत असल्यामुळे पैशांचा खडखडट होत असल्यामुळे एटीएम सुरू करून सुरळीत सुरू करावे घाटनांदुर व परिसरातील ग्राहकांची होत असलेली गैरसोय च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन दूर करावी असे घाटनांदुर येथील व परिसरातील नागरिकातून येत आहे.

# श्री क्षेत्र पंढरपूर येथील मठ मंदिर उद्घाटन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा–महंत महादेवानंद भारती महाराज

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानचे मठाधिपती महंत गुरुवर्य श्रीश्री १००८ ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या नियोजनात व संकल्पनेतून श्री क्षेत्र पंढरपूर शेगाव दुमाला येथे भव्य–दिव्य महादेवानंद भारती बाबा मठ श्री.छत्रपती शिवाजी महाराज मंदिर व अश्वत्थ पशुपतीनाथ मंदिर उभारले आहे.या मठ मंदिराचे आषाढी वारी निमित्त शनिवार दि.०५/०७/२०२५ रोजी दुपारी ३:३०



आ.धस व साधु–संतांच्या हस्ते होणार उद्घाटन

वा.पंढरपूर येथे उद्घाटन संपन्न होत आहे.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महंत गुरुवर्य श्रीश्री १००८ ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांनी केले आहे.उद्घाटन सोहळा आमदार सुरेश धस (आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा) तसेच अनेक साधु–संत महंत यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष आ.अभिजीत पाटील माढा मतदारसंघ तसेच प्रमुख उपस्थिती बीड जिल्ह्याचे खासदार ◀◀ पान २ वर

# रात्रीच्या अंधारात सुरू असलेले मुख्य रस्त्याचे काम दिवसा सुरु

### दैनिक लोकतंत्र च्या बातमीचा दणका

किल्लेधारूर । प्रतिनिधी

किल्लेधारूर शहरातील मुख्यबाजार पेठे रस्त्याचे काम बोगस होत असुन रात्री च्या अंधारात काम उरकले जात असल्याचे दै. लोकतंत्र मध्ये वृत्त प्रकाशित झाले होते. त्याची दखल घेऊन गुत्तेदाराने दिवसा काम सुरू केले असून जनतेसमोर किमान काम तरी उत्तम होईल अशी भावना जनतेतून व्यक्त होत आहे.



उर्वरित काम तरी नियमाप्रमाणे करण्यात यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

# पाटोदयात आशा सेविका भरतीत गैरप्रकार उपोषणाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील आशा सेविका भरतीमध्ये गितांजली किसन सांगळे यास पात्र असतांना अपात्र उमेदवार यांची निवड केली ती रद्द करुन मला न्याय द्यावा नसता ता.आरोग्य कार्यालयात समोर आमरण उपोषण करणार असल्याचे गितांजली यांनी निवेदनात म्हटले आहे

याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा शहरात आशा सेविका भरती झालेली असुन त्यामध्ये बेकायदेशीर उमेदवार यांची भरती केली असल्यामुळे पात्र उमेदवार यांच्यावर अन्याय झालेला आहे. आपण आशा सेविकेचे मुलाखती घेवून बेकायदेशीर पणे आपण पात्र उमेदवार गितांजली किसन सांगळे यास पात्र असताना डावलले आहे. तसेच भरती प्रक्रियेत आपण जाहिरात देणे बंधनकारक असतांना दिली नाही व शैक्षणिक पात्रता नाही. सदरचे आरोग्य केंद्रात आपण जी आशा सेविका म्हणून नियुक्ती केली ती बेकायदेशीर असुन कोणत्याही नियमात बसत नसल्यानंतर ही आपण त्यांची नियुक्ती करुन पात्र उमेदवारावर अन्याय केला आहे.तरी पात्र उमेदवार गितांजली किसन सांगळे शैक्षणिक पात्रता एन.ए.एम.बी.ए. तसेच कोविड मध्य २ वर्षे काम केलेला अनुभव प्रमाणपत्र असतांनाही तीस टाळुन अपात्र उमेदवार हि फक्त विधवा असल्याने नियम डावलून कसल्याही नियमात नसतांना कोणाच्यातरी दबावापोटी आपण नियुक्ती पत्र दिले ते बेकायदेशीर असुन त्यांची नियुक्ती रद्द करावी, नसता आपल्या ऑफीस समोर अमरण उपोषण करण्यात येईल असे गितांजली यांनी निवेदनात म्हटले आहे

# पुनर्रचीत हवामान आधारित फळपिक विमा भरण्यास मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

पुनर्रचीत हवामान आधारित फळ पिक विमा योजना मृग बहार सन २०२५ बीड जिल्ह्यामध्ये बजाज जनरल इन्सुरंस कंपनी मार्फत राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मृग बहार सन २०२५ मध्ये पेरू, लिंबू, संत्रा, चिकू, मोसंबी या पिकांसाठी ०६ जुलैपर्यंत फळ पीक विमा योजनेत भाग घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी याची नोंद घेऊन केंद्र शासनाचे विमा योजना संकेतस्थळ ... वर अर्ज करून सहभागी व्हावे व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

# छोटेवाडी येथे हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

कृषी महाविद्यालय पाथरी अंतर्गत ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम () व कृषी औद्योगिक सलग्नता उपक्रम २०२५–२६ अंतर्गत दि ०२ जुलै बुधवार रोजी छोटेवाडी, रामनगर येथे महाराष्ट्र कृषी दिन आणि हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गावचे सरपंच अंगद कटके यांनी भूषविले. त्यांच्यासोबत ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अतिक्रमणे न काढल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई; आ.सुनिल कांबळेच्या लक्षवेधीवर शासनाचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिकेकडून रस्ता रूंदीकरण करण्यात आले आहे. मात्र, या रस्त्यांवर आता मोठ्या प्रमाणात अनधिकृत व्यावसायिक आणि अनधिकृत जाहीरात फलक उभारण्यात आले आहेत. त्यावर तातडीनं कारवाई न झाल्यास संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेश महापालिका प्रशासनास दिले असल्याची माहिती नगरविकास विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.**



कॅन्टोन्मेट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनिल कांबळे यांनी शहरातील दिवसें दिवस गंभीर होणारी वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना होणारा मनस्ताप तसेच, शहरात वाहनांची भरमसाठ संख्या वाढलेली असताना पोलीस, महापालिका आणि आरटीओ कडून दूर्लक्ष होत असल्याची लक्षवेधी उपस्थित केली होती.

तसेच, शहरात महापालिका रस्त्यांचे रूंदीकरण करत असली तरी त्यावर वारंवार अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे होतात. त्यामुळे, वाहतूक कोंडी होत असून अपघातांची संख्या वाढल्याने घरातून बाहेर पडलेली व्यक्ती परत येइल का नाही अशी भिती नागरिकांमध्ये असते. या बाबत शासन काय करणार असा प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी एकात्मिक वाहतूक विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्याद्वारे, मेट्रो, उड्डाणपूल, रस्ता रूंदीकरण, भुयारी मार्ग प्रस्तावित आहेत. मात्र, शहरातील रस्त्यावर झालेली अतिक्रमणे ही वस्तुस्थिती असून ती तातडीनं काढण्याचे आदेश महापालिकेस दिले आहेत. तसेच, जर या अतिक्रमणांवर कारवाईस दिरंगाई झाली अथवा कारवाई केली जात नसल्यास संबधित अधिकाऱ्यास जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना राज्यशासनाकडून महापालिकेस देण्यात आल्या आहेत

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाच्या प्रांजलीचा डबल सुवर्ण धमाका!

पुणेः एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग पुणेच्या स्कुल ऑफ बायोइंजिनिअरिंगची विद्यार्थीनी प्रांजली विनोद सुरदुसे हिने नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या १०वी वरिष्ठ गट राष्ट्रीय मिनी गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेच्या स्ट्रोक महिला सांघिक गटात व श्री जगदीश प्रसाद झाबरमल टिबरेवाल विद्यापीठ, मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ मिनि गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेच्या एकेरी स्ट्रोक गटात सुवर्णपदक पटकावत दैदिप्यमान कामगिरीची नोंद केली आहे.




प्रांजलीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना ६ खेळाडूंच्या संघात सर्वात कमी ६२ गुण घेत सर्वोत्तच कामगिरीची नोंद केली. महाराष्ट्र पाठोपाठ मध्यप्रदेश व उत्तर प्रदेश संघांनी रौप्य व कांस्य पदक पटकाविले. यासह अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेतही कामगिरीत सातत्य ठेवताना दैदिप्यमान कामगिरीची नोंद करत सुवर्णपदक पटकाविले. प्रांजली ही एमआयटी एडीटी विद्यापीठाची अत्यंत हुरहुन्नरी खेळाडू असून तिने काही महिन्यांपूर्वीच ३७ व्या राष्ट्रीय मिनीगोल्फ स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करताना रौप्य व जेजेटीयू विद्यापीठ झुंझनू, राजस्थान येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मिनी गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पदक देखील पटकाविले होते.

प्रांजली या या सुवर्ण कामगिरीबद्दल विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.मोहित दुबे, डॉ.रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभागाचे संचालक व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा.पद्माकर फड, डॉ.सुराज भोयार यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# कोंढव्यात २५ वर्षीय तरूणीवर लैंगिक अत्याचार; आरोपीने कुरिअर बॉयची केली बतावणी, तोंडावर केमिकल स्प्रे मारला अन्...

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील कोंढवा परिसर एका २५ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणीवर काल (बुधवारी, ता २) रात्री साडेसातच्या सुमारास अज्ञात इसमाने अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेबाबत पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी माहिती देताना सांगितलं की,कोंढव्यातील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणीवर बुधवारी रात्री साडेसातच्या सुमारास अज्ञात इसमाने अत्याचार केला. कोंढव्यातील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये ही घटना घडली आहे. आरोपीने स्वत:ला कुरिअर बॉय असल्याचे सांगून सोसायटीमध्ये प्रवेश केला. दरवाज्यावर पोहोचल्यावर त्याने पीडित महिलेला बँकेच कुरिअर आहे असे सांगितलं, त्यानंतर जबरदस्तीने घरात शिरून तिच्यावरती बलात्कार केला.



पोलिसांच्या १० टीम त्याचा तपास करत आहे. तरुणी आपल्या भावासोबत कोंढव्यात राहते. तरुणी मूळची अकोल्याची आहे. ती पुण्यातील कल्याणी नगरमधील कंपनीत काम करते अशी माहिती देखील पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी दिली आहे. दरम्यान आरोपीने सोसायटीमध्ये जाण्यासाठी स्वत:ला कुरिअर बॉय असल्याचे सांगितले होते. दरवाज्यावर पोहोचल्यावर त्याने पीडित महिलेला बँकेच कुरिअर आहे असे सांगितलं होतं, मात्र तरूणीने ते आपलं नसल्याचं सांगितलं, पण त्याने त्यावर सही करावी लागेल असं सांगितल्याने तरूणीने सेफ्टी डोअर उघडला आणि त्याचा फायदा नराधम आरोपीने घेतला.

नेमकं प्रकरण काय?


मिळालेल्या माहितीनुसार, कोंढव्यातील एका गार्डेड सोसायटीमध्ये ही संतापजनक घटना घडली आहे. आरोपीने स्वत:ला कुरिअर बॉय असल्याचे सांगून सोसायटीमध्ये प्रवेश केला. पिडीतेच्या दरवाज्यावर पोहोचल्यावर त्याने पीडित महिलेला कुरिअर आहे असे सांगितले. महिलेने हे कुरिअर माझे नाही असं सांगत नकार दिला. मात्र आरोपीने सही करावी लागेल असा आग्रह धरला. त्यामुळे महिलेला सेफ्टी डोअर उघडावा लागला. त्याचवेळी आरोपीने तरूणीच्या तोंडावरती केमिकल स्प्रे मारला, ज्यामुळे ती बेशुद्ध झाली. यानंतर त्याने तिच्यावर बलात्कार केला.

ही घटना उच्चभ्रू व सुरक्षित मानल्या जाणाऱ्या सोसायटीत घडल्याने सुरक्षेच्या दृष्टीने मोठे प्रश्न उपस्थित झाले आहे. आरोपीने अतिशय हुशारीने कुरिअर बॉयचे भान ठेवत गेट पार केला. सुरक्षारक्षकांकडून त्याची फारशी चौकशी झाली नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. कोंढवा पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. सोसायटीमधील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून आरोपीचे ओळख पटवण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

# धक्कादायक! पुण्यातील भोंदूबाबाच्या आश्रमात वेगवेगळ्या गोळ्यांची पाकिटे; २ आयपॅडही जप्त

पुणे । प्रतिनिधी

राज्याची सांस्कृतिक नगरी आणि शिक्षणाची पंढरी असलेल्या पुणे जिल्ह्यातील एका भोंदू बाबाचे अनेक कारनामे समोर आले असून पोलिसांनी या बाबाला अटक केली आहे. अंधश्रद्धेचा फायदा घेत भक्तांची फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबाची हायटेक विकृती समोर आली. प्रसाद दादा ऊर्फ बाबा ऊर्फ प्रसाद तामदार (वय २९, रा. सूस गाव, मुळशी) या तथाकथित बाबावर बावधन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून, त्याच्या विरोधात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पोलिसांनी बाबाला अटक केल्यानतंर तपासादरम्यान धक्कादायक समोर आली आहे. हा बाबा इलेक्ट्रॉनिक्स गॅझेटच्या (ेलळश्रश) माध्यमातून अश्लील चाळे करायचा. तर, भोंदू बाबाच्या आश्रमातून आता पोलिसांना वेगवेगळ्या गोळ्यांची पाकिटे आढळून आली आहेत.



आरोपी भोंदूबाबा प्रसाद हा भक्तांच्या मोबाइलमध्ये 'हिडन प' डाऊनलोड करून भक्तांच्या खासगी क्षणांवर नजर ठेवत असे. याशिवाय, तो भक्तांना गुंगीचे औषध देऊन अश्लील चाळे करत होता. पोलीस तपासातून या कृत्याची झलक पाच वेगवेगळ्या भक्तांच्या चौकशीतून समोर आली आहे. बाबा स्वतःला भक्तांचे दोष स्वतःवर घेतो, त्यांच्यावर संकट आहे, आणि त्यासाठी विशिष्ट उपाय करतो, अशी बतावणी करत असे. जर एखाद्या भक्ताने बाबाच्या कृतीला विरोध केल्यास बाबा मृत्यूची तारीख लिहून भीती दाखवत असे, असेही पोलीस तपासातून समोर आलं आहे. त्यामुळेच, अनेक भक्त मानसिक दबावाखाली बाबाच्या सांगण्यानुसार वागत होते. त्यातच, आता पोलीस कोठडी संपत असताना पोलिसांनी आणखी सबळ पुरावे आढळून आलेहेत.

भोंदू बाबाच्या आश्रमात गोळ्यांची पाकिटे

साधकांच्या मोबाईलमध्ये प डाऊनलोड करत त्यांचे खाजगी क्षण पाहणाऱ्या भोंदू बाबा प्रसाद तामदार याची पोलीस कोठडी संपत असतानाच पोलिसांनी या भोंदू बाबाच्या गळ्याभोवती फास आवळायला सुरुवात केली आहे. पोलिसांनी भोंदू बाबाच्या आश्रमातून ३ मोबाईल २ ळरिव, सोलोपोशे ०.५ाव च्या गोळ्यांचं मोकळं पाकीट, प्रोव्हेनॉलच्या ९ गोळ्या, सिमकार्ड आणि पेन ड्राईव्ह हे साहित्य जप्त केलं आहे. भोंदू बाबाकडील इलेक्ट्रॉनिक गॅझेटमध्ये अनेक अश्लील व्हिडिओ क्लिप्स असण्याची दाट शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यासाठीच पोलीस हे सर्व साहित्य न्याय वैद्यकीय प्रयोगशाळेत पाठवणार असून त्यामध्ये नेमका कोणता डाटा आहे, याची माहिती घेणार आहेत.दरम्यान, भोंदू बाबाकडे इतर वैद्यकीय औषधंही मिळाली आहेत. या औषधांचा नेमका वापर काय? याचीही तपासणी पोलीस करणार आहेत.

# पहिल्या फेरीतील प्रवेशासाठी ७ जुलैपर्यंत अखेरची मुदत

पुणे – केंद्रीय ऑनलाइन इयत्ता अकरावीसाठी प्रवेशप्रक्रियेअंतर्गत राज्यातील १४७ कनिष्ठ महाविद्यालयात ८० टक्क्यांहून अधिक प्रवेश जाहीर झाले आहेत. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी ७ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.



माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेतील पहिल्या फेरीची निवड यादी जाहीर केली. त्यात ६ लाख ३२ हजार १९४ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली असून, ४ लाख ५७ हजार ८४१ विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पहिल्या पसंतीचे कनिष्ठ महाविद्यालय मिळाले आहे, अशा विद्यार्थ्यांना ७ जुलैपर्यंत प्रवेश घ्यावा लागणार आहे. ऑनलाइन प्रवेशासाठी नवीन विद्यार्थी नोंदणी व अर्जचा भाग–१ भरणे, नियमित पहिल्या फेरी मध्ये नोंदणी अपूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्जाचा भाग–१ भरण्याची सुविधा संकेतस्थळावर आहे. नियमित दुसरी फेरी मधील अर्जाचा भाग –२ पसंतीक्रम देण्याची सुविधा १० ते १३ जुलैपर्यंत देण्यात आली आहे.

दरम्यान, पहिल्या नियमित फेरीमध्ये आत्तापर्यंत एकूण १ लाख ४३ हजार ८४ इतके प्रवेश झाले आहेत. विविध कोट्यातील ६७ हजार १५२ इतके प्रवेश झालेले आहेत. मंगळवारपर्यंत एकूण २ लाख १० हजार २३६ इतके प्रवेश झाले आहेत.

# उरुळी कांचन येथे रस्त्यावर उभ्या असलेल्या सहा जणांना पिकअपची जोरदार धडक; दोघांचा मृत्यू, चोघे गंभीर

**उरुळी कांचन : पुणे– सोलापूर महामार्गावर वाहनाची वाट पाहत बसलेल्या सहा जणांना एका भरधाव पिकअप चालकाने जोरदार धडक दिली. या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर चौघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. बुधवारी (ता. ०२) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील तळवडी चौकात हा अपघात झाला.**



या अपघातात अशोक भीमराव (वय– २५, रा. बसनाळ सावली बिदर कर्नाटक), व मेहबूब रहमान मियाडे (वय–६७, रा. माकर वस्ती सहजपुर ता. दौंड) असे या अपघातात मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. तर या अपघातात भारती लक्ष्मण बापूराव रा. आश्रम रोड, उरुळी कांचन, ता. हवेली), मैनुद्दीन लालमिया तांबोळी (वय ६७, रा. आंबा पिंपळगाव, लातूर), वैशाली भागवत बनसोडे (वय ४०,रा. सोरतापवाडी ता. हवेली, पुणे), भागवत बनसोडे वय–४५, हे चार जण गंभीर जखमी झाले आहेत.


अपघात करून पळून गेलेल्या आरोपी चालकाला उरुळी कांचन पोलिसांनी ताब्यात घेतले असून शशिकांत रोहिदास पवार (वय– २४, रा. अकलूज, ता. माळशिरस, जिल्हा सोलापूर) असे चालकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूरच्या दिशेने जाण्यासाठी सहा जण तळवडी चौकात वाहनाची वाट पाहत रस्त्याच्या कडेला उभे होते. याच दरम्यान सोलापूर च्या दिशेने एक पिकअप वाहन निघाले होते.यावेळी चौकात उभे राहिलेल्या चौघांना पिकअप चालकाने जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका होता की एकाचा जागीच मृत्यू झाला तर तर उर्वरित पाच जणांना गंभीर दुखापत झाली. जखमींना लाईफ केयर रुग्णवाहिकेतून सिद्धिविनायक हॉस्पिटल हा ठिकानी पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. या उपचारादरम्यान आणखी एकाचा मृत्यू झाला.दरम्यान, या अपघातात पिकअप चालक हा सोलापूरच्या बाजूने न थांबता पळून गेला आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अक्षय बंटी कांचन ओंकार रानवडे, तुषार पांगारे, प्रथमेश जगताप, आर्यन जगताप आदींनी तातडीने घटनास्थळी पोहोचले व तातडीने मदतकार्य करत जखमींना रुग्णालयात दाखल केले.दरम्यान, या अपघात ग्रस्त पिकअप चालकाला उरुळी कांचन पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर पाटील यांनी दिली आहे.

# आजच्या पिढीच्या वाचनाबद्दल मला चिंता - निशिगंधा वाड

**पुणे | प्रतिनिधी**

**आईमुळे मी लिहिती झाले. तिच्या पहिल्या लेखनाचे आम्ही वाचक असायचो. माझे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले असले, तरी पहिली कविता मराठीत केली होती. आजकालच्या पिढीच्या वाचनाबद्दल मला चिंता वाटते. या पिढीने किती मराठी पुस्तके वाचली आहेत किंवा किती मराठी लेखकांची नावे त्यांना माहिती आहेत, याबाबत शंका वाटते. त्यामुळे दिवाळी अंकासारखी ज्ञानगंगा, आपली अभिरुचीसंपन्नता जपणे गरजेचे आहे, असे मत अभिनेत्री निशिगंधा वाड यांनी मंगळवारी व्यक्त केले.**



दिनमार्क पब्लिकेशनच्या वतीने स्व. कमलाबाई रसिकलाल धारीवाल पुरस्कृत छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेतील विजेत्या अंकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, माजी संमेलनाध्यक्ष भारत सासणे, प्रसिद्ध कवयित्री सिसिलिया कार्व्हालो, स्पर्धेचे परीक्षक माधव राजगुरू, प्राजक्ता शिलेदार आणि संयोजक दिनकर शिलेदार या वेळी उपस्थित होते.

दिवाळी अंक म्हणजे मराठी माणसांचा मानबिंदू आहेत. प्रतिभेला वाव देत लेखक घडविण्याचे श्रेय दिवाळी अंकांनाच दिले पाहिजे. दिवाळी अंकांची संख्या वाढत असल्याचा आनंद आहे, असे सासणे म्हणाले. दिवाळी अंक ही लेखकांसाठीची प्रयोगशाळा आहे. दिवाळी अंकांमुळे साहित्य निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. दिवाळी अंकांची संख्यात्मक वाढ होत असली, तरी त्यांची गुणवत्ता हा चिंतेचा विषय आहे.विज्ञाननिष्ठ समाजामध्ये ज्योतिषविषयक दिवाळी अंक सर्वाधिक खपाचे आहेत, हे वास्तव आहे. दिवाळी अंकांचे व्यासपीठ छोटे असले, तरी त्याचा आवाका मोठा आहे, असे प्रा. जोशी यांनी नमूद केले. माझ्या ललित गद्य लेखाला पुरस्कार मिळाल्याचा याचा आनंद आहे, अशी भावना कार्व्हालो यांनी व्यक्त केली. अन्वय बेंद्रे यांनी सूत्रसंचालन केले.

# शिरूरचे डॉ. राजेंद्र दुगड यांचा अहमदाबाद येथील ज्योतिष महाकुंभ संमेलनात पुरस्काराने गौरव

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्याचे ज्योतिष शास्त्र व हस्तरेषा क्षेत्रातील नामांकित तज्ञ डॉ. राजेंद्र बाबूलाल दुगड यांना लाईफटाईम अचिव्हमेंट हस्तरेषा तज्ञ पुरस्कार तसेच आंतरराष्ट्रीय हस्तरेषा तज्ञ, ज्योतीष' हस्तरेषा विद्वान गोल्ड मेडल अवॉर्ड पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. हा भव्य पुरस्कार अहमदाबाद (गुजरात) येथे आयोजित 'ज्योतिष महाकुंभ मेळावा २०२५' या आंतरराष्ट्रीय पातळीवरील संमेलनात प्रदान करण्यात आला आहे.



या संमेलनात आंतरराष्ट्रीय ज्योतिष व लालकिताब तज्ञ डॉ. अनिल वत्स आणि डॉ. नीता जानी यांच्या हस्ते डॉ. दुगड यांना गौरवचिन्ह, प्रमाणपत्र व शाल–श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे शिरूर तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.डॉ. राजेंद्र दुगड यांनी १९८४ पासून हस्तरेषा शास्त्राचा अभ्यास सुरू केला आणि सतत प्रयोगशीलतेच्या जोरावर या क्षेत्रात उच्च स्थान प्राप्त केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना २०१९ साली हस्तरेषा शास्त्रात पीएच.डी. (डॉक्टरेट पदवी) बहाल करण्यात आली होती.त्याच वर्षी त्यांनी गोल्ड मेडलिस्ट अवॉर्ड देखील मिळवला होता. त्यांनी हजारो जणांच्या जीवनातील अडचणींवर मार्गदर्शन करत अचूक भविष्यवाणी व हातातील रेषांमधून व्यक्तिमत्त्व विश्लेषणाची वेगळी ओळख निर्माण केली आहे.डॉ. दुगड यांचा हा सन्मान केवळ वैयक्तिक नसून, शिरूर तालुक्याच्या वैभवात भर घालणारा ठरला आहे. अनेक समाजसेवक, ज्योतिषप्रेमी, शिष्यवर्ग व स्थानिक नागरिकांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले असून, त्यांच्याकडून आगामी काळातही मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.